मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १७३ ■ सोमवार, ०२ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# गुरु तेग बहादूरांच्या शौर्याची परंपरा नवी पिढीपर्यंत पोहोचवणे हीच खरी सेवा : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या पवित्र भूमीवर 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी 350 वा शहिदी समागमाच्या माध्यमातून आपण महान परंपरेचे साक्षीदार होत आहोत. गुरूंनी दिलेला त्याग आणि सामाजिक एकतेचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे, असा संदेश प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ध्वनिचित्रफितद्वारे दिला. अल्पसंख्यांक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने खारघर येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संदेश ध्वनिचित्रफितद्वारे दाखविण्यात आला.

यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी सांगितले की, गुरूंनी त्यागाची पराकाष्ठा केली. त्या काळात समाजातील सर्व घटक एकत्र उभे राहिले. सत्य आणि संस्कृतीसाठी ठाम राहण्याची प्रेरणा समाजाला मिळाली. या सामाजिक एकतेच्या महायज्ञात गुरु गोविंद सिंह आणि गुरु नानक नाम लेवा संगत यांची महत्त्वाची भूमिका होती. आज देशाला पुन्हा सामाजिक एकतेची गरज असताना हा समागम आश्वासक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. या यात्रेची सुरुवात गेल्या वर्षी नागपूर येथून झाली. त्यानंतर तख्त श्री हजूर साहिब, नांदेड येथे कार्यक्रम पार पडला आणि आता नवी मुंबईत हा समागम महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. या उपक्रमाद्वारे श्री गुरु तेग बहादूर यांचा शौर्यपूर्ण इतिहास महाराष्ट्रातील हजारो गावांपर्यंत पोहोचविण्यात आला आहे. या आयोजनाबद्दल प्रधानमंत्र्यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले.



देशभरात श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम होत असल्याचे सांगत हरियाणातील कुरुक्षेत्र येथे झालेल्या भव्य कार्यक्रमात सहभागी होण्याचा अनुभव त्यांनी सांगितला. केंद्र शासन गुरू संबंधित प्रत्येक ऐतिहासिक प्रसंग राष्ट्रीय स्तरावर साजरा करत आहे. 400वा प्रकाश पर्व, स्मृतिचिन्ह टपाल तिकीट आणि विशेष नाण्याचे प्रकाशन, तसेच गुरु नानक देव यांचा 550वा प्रकाश पर्व श्रद्धेने साजरा करण्यात आल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. साहिबजाद्यांच्या सन्मानार्थ 'वीर बाल दिवस' साजरा करण्याची परंपराही सुरू करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. शीख समाजासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन सांगितले की, करतारपूर साहिब कॉरिडॉर विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आला. श्री हेमकुंड साहिब यात्रेसाठी सुविधा उभारण्यात आल्या. शीख संघटना आणि गुरुद्वारांशी संबंधित संस्थांना एफसीआरए अंतर्गत सवलती देण्यात आल्या. शीख इतिहासाला अभ्यासक्रम आणि सांस्कृतिक चर्चेत स्थान देण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

अफगाणिस्तानातील शीख बांधवांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि गुरु ग्रंथ साहिब यांच्या सन्मानासाठी सरकारने मिशन मोडमध्ये काम केले. गुरु ग्रंथ साहिबांचे स्वरूप सुरक्षितपणे भारतात आणण्यात आले. जम्मू-काश्मीरमधील शीख कुटुंबांसाठी पुनर्वसन पॅकेज लागू करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

शीख समाजाच्या श्रद्धेचा सन्मान आणि त्यांच्या प्रगतीसाठी नवे मार्ग निर्माण करणे ही आमची जबाबदारी असून ही सेवा करण्याचे आम्हाला सौभाग्य लाभले आहे, असे नमूद करत त्यांनी नवी पिढी गुरूंच्या साहस आणि सत्याच्या मूल्यांशी जोडली गेली पाहिजे, असे आवाहन केले.

इतिहास केवळ स्मरणात न ठेवता तो आचरणात आणणे हेच या समागमाचे उद्दिष्ट असल्याचेशेवटी ते म्हणाले .


## पनवेल ग्रामीण भागात डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे स्वच्छता अभियान प्रेरणादायी संपन्न

### "स्वच्छ-सुंदर माझे गाव " राखण्यासाठी प्रेरणादायी स्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** डॉ.श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या प्रेरणेने व डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ.सचिनदादा धर्माधिकारी मार्गदर्शनाखाली १ मार्च रोजी पनवेल तालुक्यातील नेरे, चेरीवली, वाकडी, रिटघर, दूंदरे, सुकापूर आणि कुडेवहाळ या गावांमध्ये व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या उपक्रमात तब्बल १५३४ स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेत एकूण ९७५० चौ.मी. परिसर स्वच्छ केला. शासकीय रुग्णालय, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत कार्यालय, पोलिस चौकी तसेच स्मशानभूमी



परिसराची स्वच्छता करण्यात आली. मोहिमेदरम्यान सुमारे १९८३० किलो कचरा गोळा करण्यात आला. संबंधित गावांचे सरपंच,उपसरपंच, ग्रामसेवक पोलीस पाटील, डॉक्टर आणि स्थानिक नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.ही मोहीम केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून सामाजिक बांधिलकीची जाणीव जागृत करणारी ठरली. प्रतिष्ठान गेली अनेक वर्षे समाजप्रबोधन, व्यसनमुक्ती अभियान, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती, शिक्षणविषयक मार्गदर्शन आणि आपत्तीग्रस्तांना मदत अशा विविध उपक्रमांतून समाजहिताचे कार्य सातत्याने राबवत आहे. "स्वच्छता हीच सेवा" मानत प्रतिष्ठानचे दास यांनी शिस्तबद्ध व संघटित पद्धतीने समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. ग्रामीण भागात स्वच्छतेची सवय रुजविणे, नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणे हेच या अभियानामागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. या उपक्रमामुळे परिसर स्वच्छ होण्याबरोबरच नागरिकांमध्ये "स्वच्छ-सुंदर माझा गाव " प्रेरणादायी समाज प्रबोधनयुक्त स्वच्छता अभियान दिसून आले.

## डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पनवेल तालुक्यात भव्य स्वच्छता अभियान

**दैनिक युवक आधार**

**केतन मांगळोकर /पनवेल (प्रतिनिधी)** : डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे डॉ. श्री आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी पनवेल तालुक्यातील नेरे, चेरीवली, वाकडी, रिटघर, दूदरे, सुकापूर आणि कुंडेवहाळ या गावांमध्ये भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या या स्वच्छता अभियानात एकूण १५४२ सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमांतर्गत सुमारे ८९६० चौ. मीटर परिसर स्वच्छ करण्यात आला. यामध्ये शासकीय रुग्णालय परिसर, जिल्हा परिषद शाळेचा परिसर, ग्रामपंचायत कार्यालय परिसर, पोलीस चौकी परिसर तसेच स्मशानभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली.या अभियानादरम्यान सुमारे २०,८३० किलो कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. स्वच्छतेबरोबरच ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती





करण्यावरही विशेष भर देण्यात आला.

या उपक्रमात संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील तसेच अनेक ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्त सहभाग घेतला. तसेच डॉक्टर आणि प्रतिष्ठानचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.नेहमीप्रमाणेच शिस्तबद्ध आणि समाजजागृतीचा संदेश देणारे हे स्वच्छता अभियान यशस्वीपणे पार पडले.

## डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम विशेष मुलांनी केली उत्साहात होळी साजरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** फाल्गुन महिन्यात होळी व रंगपंचमी हा सण मोठ्या उत्साहात सर्वत्र साजरा केला जातो.डॉ.एन. एम. जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेतही हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला गेला.

हा सण साजरा करताना निसर्गाची हानी होणार नाही व पर्यावरणपूरक असा हा सण साजरा केला जाईल याची काळजी घेतली गेली. विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून होळी व रंगपंचमी या सणांविषयी माहिती देण्यात आली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.श्रेया जाधव यांच्या कल्पनेतून साकारलेली पर्यावरणपूरक अशी मिनी होळी विद्यार्थ्यांनी तयार केली. शाळेच्या आवारातील झाडांच्या वाळलेल्या फांद्या गोवऱ्या, कापूर, गवत अशा गोष्टींपासून व्यावसायिक गटाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने सुंदर मिनी होळी साकारली. शाळेतील विविध गटातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने आर्ट आणि क्राफ्ट मधून होळीची सजावट केली. सर्वांनी मिळून होळीचे पूजन









करत होळीला नैवेद्य दाखवून होळीचे दहन केले. सर्वांच्या चांगल्या आरोग्यासाठी व भरभराटीसाठी होळी समोर प्रार्थना केली. मा. दीपा भट्टाचार्य यांनी मुलांसाठी समोसा व ज्यूस खाऊ म्हणून दिले होते. खाऊ खाल्यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांसोबत नैसर्गिक रंगांनी रंगपंचमी खेळली. या रंगांचे वैशिष्ट्य असे की हे रंग विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पालक, गाजर, बीट, हळद अशा नैसर्गिक पदार्थांनी बनवले होते. विद्यार्थ्यांनी संगीताच्या तालात नृत्य करत एकमेकांसोबत सुंदर अशी रंगपंचमी खेळली. विद्यार्थ्यांना मौजमजा करण्यासाठी आवडणारा होळी व रंगपंचमीचा सण सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात शाळेत साजरा केला.

## तिगाव येथे त्रिदिवसीय भव्य शंकर पटाचा थरार; अनिल बिसेन यांच्या हस्ते शानदार उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/ गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया जिल्हा तिगाव ग्रामीण संस्कृतीचे वैभव आणि वैशिष्ट्य असलेल्या त्रिदिवसीय भव्य शंकर पटाचे (बैलगाडा शर्यत) आयोजन तिगाव येथे करण्यात आले आहे. आज दिनांक २८ फेब्रुवारी रोजी या ऐतिहासिक पटाचा उद्घाटन सोहळा परिसरातील मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

**मुख्य उद्घाटन आणि अध्यक्ष**

या भव्य शंकर पटाचे उद्घाटन देवरी पंचायत समितीचे सभापती मा. अनिल बिसेन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंजोरा जिल्हा परिषद क्षेत्राच्या सदस्या सौ.



उषाताई मेंढे लाभल्या होत्या.

**प्रमुख पाहुणे आणि निमंत्रित मान्यवर**

या उद्घाटन सोहळयाला प्रमुख पाहुणे म्हणून ललित ठाकूर आणि दिगंबर बोपचे उपस्थित होते. त्यांच्यासह खालील प्रतिष्ठित व्यक्तींनी कार्यक्रमाची शोभा वाढवली:

कुंजन कुमार तुरकर (सरपंच, तिगाव तथा रिपोर्टर),अशोक शेंडे सर (मुख्याध्यापक, समर्थ विद्यालय),यशवंतराव पुंड आणि अशोक पटले,,संदीप तिरेले (उपसरपंच),दुधरामजी गायधने (माजी पोस्ट मास्टर) व घनश्याम गायधने (पोलीस पाटील),कैलास मेश्राम (तंटामुक्ती अध्यक्ष),दिनेश बोपचे (ग्रामपंचायत सदस्य),नरेश बोपचे (संपादक, सत्य को जानो न्यूज)

आयोजन आणि व्यवस्थापन समितीहा सोहळा यशस्वी करण्यासाठी समितीच्या सदस्यांनी चोख नियोजन केले आहे:

समिती नेतृत्व: मधुजी रांगडाले (अध्यक्ष), हसलाल भोंडे (उपाध्यक्ष).

मैदानी व्यवस्थापन: राहुल ठाकरे (घडी मास्तर), प्रशांत तुरकर (झेंडी मास्तर) आणि राजू काळसर्पे (व्यवस्थापक).

निर्णायक मंडळ: प्रवीण बोपचे आणि आनंद बोपचे.

समिती सदस्य व सहकार्य: कमला प्रसाद हरिणखेडे, मोहन मडावी, गोपीचंद मडावी, बबलू बघेले, कन्हैया बोपचे, राहुल बोपचे, श्रीराम मुनेश्वर, व्यंकटजी गायधने, उज्ज्वल शेंडे, आकाश बिसेन, आशिष बोपचे आणि अंकित बोपचे.

**गावकरी व दर्शकांचा मोठा प्रतिसाद**

या उद्घाटन प्रसंगी तिगावसह परिसरातील इतर गावकरी, नागरिक, समितीचे अन्य सदस्य, बैलजोडी मालक, कातकरी आणि हजारो दर्शक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मैदानातील थरार पाहण्यासाठी प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

# शांतता समितीची बैठक संपन्न

## पोलीस ठाण्यात झालेल्या बैठकीत डिजे वाजणार नाही चा संकल्प



**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर : (प्रतिनिधी) सय्यद इसा** : येणाऱ्या पवित्र होळी सन आणि रमजान तसेच बाबा सोनापिर उर्स निमित्य माहूरच्या पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शांतता समितीची बैठक पार पडली या बैठकीत यापुढे कुठल्याही सण उत्सव काळात डीजे वाजणार नाही असा संकल्प घेण्यात आला

श्रीक्षेत्र माहूर शहर हे तीर्थक्षेत्राचे ठिकाण असून येथे सण-उत्सवासह जयंती पुण्यतिथी यासह वर्षभर होणाऱ्या यात्रा महोत्सवात मिरवणुका निघत असतात तर लहान थोरांचे वाढदिवसही मोठ्या प्रमाणात साजरे होत असतात या ठिकाणी छोट्या मोठ्या आवाजात डीजे वर गाणे यासह इतर भाषणे वाजविले जात असल्याने अनेक वेळा शांतता कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याचा प्रसंग उद्भवतो त्यामुळे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी उपस्थितांना डिजे वाजवू नका असे आवाहन केल्याने झालेल्या बैठकीत यापुढे डीजे वाजणार नाही असं संकल्प शांतता समितीच्या बैठकीत घेण्यात आला

या बैठकीत सपोनी शरद घोडके पो उप नी पालसिंग ब्राह्मण पोऊपनि संदीप अन्येबोईनवाड गोपनीय शाखेचे पोका गजानन चव्हाण राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष मेघराज जाधव ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार जोशी सर ज्येष्ठ पत्रकार वसंतराव कपाटे भाजपाचे नगरसेवक गोपू महामुने एड जगदीश अडकिने भाजपाचे अजय पवार काँग्रेसचे नगरसेवक प्रतिनिधी निसार कुरेशी सुनील वानखेडे अर्जुन पवार संतोष जग्गू नाईक पत्रकार इलियास बावाणी राज ठाकूर शंकर भालेराव पवन चव्हाण यांचे सह मान्यवर उपस्थित होते.

# शांतीवन बुद्ध विहार समतेचे संदेश देणारे ठिकाण - डॉ बाळकृष्ण सार्वे

## धम्म मेळावा व 12व्या वर्धापन दिनानिमित्त चिचाळ येथे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे दोन दिवसीय धम्म मेळाव्याचे व १२ व्या वर्धापन दिनाचे आयोजन करण्यात 27 व 28 फेब्रुवारी 2026 ला आले होते. मेळाव्याला मार्गदर्शन करताना डॉ बाळकृष्ण सार्वे अध्यक्ष भंडारा जिल्हा पतसंस्था संघ मार्गदर्शन करताना म्हणाले की शांतीवन बुद्ध विहार समतेचे संदेश देणारे छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ,संत गाडगेबाबा ,डॉ बाबासाहेब आंबेडकर, सम्राट अशोक, तथागत गौतम बुद्ध , शिवली बोधी, अशोक स्तंभ,व निसर्ग रम्य वातावरण बघून भिंती बोलक्या असून




समतेचा संदेश या विहारातून दिल्या जात आहे. हे विहार बघून प्रथमच मी बघून भारावून गेल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे उद्घाटक सदानंद इलमे मुख्य संयोजक संविधान संघर्ष समिती यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणीप्रमाणे या बुद्ध विहारातून समतेचा संदेश खऱ्या अर्थानं लोकांपर्यंत पोहचतो असे मत व्यक्त केले. यावेळी माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे, रोशन जांभुळकर अध्यक्ष संविधान बचाव संघर्ष समिती भंडारा जिल्हा,, मिलिंद गोंडाने यांनी आपले विचार व्यक्त केले. सर्वप्रथम सर्व पाहुण्यांचे उपस्थितीत महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. वासेळा येथील महिलांनी लेझीम नृत्य सादर करून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.मिलिंद गोंडाणे यांनी शांतीवन विहाराकरता थंड पाण्याचे आरो मशीन देण्यात आले. त्याचप्रमाणे चिचाळ परिसरातील मेरिटमध्ये येणाऱ्या प्रथम मुलाला 10,000 हजार रुपये देण्याची घोषणा सुद्धा त्यांनी वर्धापन दिनी केली. यावेळी प्रामुख्याने शांतीवन बुद्ध विहाराचे संचालक जीवन बोधि बौद्ध ,शांतीवन बुद्ध विहाराचे अध्यक्ष धम्मरक्षित मेश्राम,सदानंद धारगावे, रामराव गाडेकर, उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन पत्रकार संजीव भांबोरे यांनी केले तर प्रास्ताविक विनय ढोके यांनी तर आभार एडवोकेट मुकेश मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वी करण्या करिता अश्विन मेश्राम, प्रणय रामटेके , सुरेश उके,विनोद डोंगरे, प्रशांत बडोले, गंगाधर गजभिये ,आशिष मेश्राम, प्रशांत कांबळे, दीपक वालदे ,रेखा सुखदेवे, सत्यशीला बौद्ध, लता भांबोरे, प्रणाली मेश्राम, राजकुमार वाहने , यांनी सहकार्य केले

सदर कार्यक्रमात मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते. यावेळी बौद्ध संमेलनानिमित्त येणाऱ्या पर्यटकांची दोन दिवस जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. विनयबोधी महाथेरो व भिक्खू संघ यांच्या उपस्थितीत महापवित्रन पाठ करून धम्मदेशना बौद्ध उपासक,उपासिका यांना देण्यात आली.

# साहिल ट्यूशन क्लासेसचे वार्षिक स्नेहसंमेलन व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर :** साहिल ट्यूशन क्लासेस, खार दांडा यांच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन, गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आणि मार्गदर्शन शिबिर शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सायं. ४ वाजता महाबोधी बुद्ध विहार सभागृह, कार्टर रोड येथे उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक श्री. फारुकी डॉक्टर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत अभ्यासात सातत्य आणि शिस्त आवश्यक असल्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेविका व उद्योजिका सौ. श्रेया ताई योगेश कदम, रुपेश मालुसरे (अखिल




भारतीय मराठा महासंघ, मुंबई अध्यक्ष व मुंबई युनिव्हर्सिटी सिनेट सदस्य), श्री. सुधीर दादा कदम (संस्थापक अध्यक्ष, युवा फाऊंडेशन व शिवसेना दापोली संपर्क प्रमुख) तसेच प्रविण दादा पवार (कोकण विभागीय अध्यक्ष, अखिल भारतीय मराठा महासंघ) उपस्थित होते.

प्रमुख उद्योजिका श्रेयाताई योगेश कदम यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, "साहिल ट्यूशन क्लासेसमध्ये प्रवेश घेऊन तुम्ही योग्य निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षणाबरोबर अतिरिक्त मार्गदर्शन घेणे आजच्या काळात अत्यंत आवश्यक आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या आवडी-निवडी समजून घेत त्यांना योग्य सहकार्य करावे. मुलांवर अनावश्यक दबाव टाकू नये. मेहनत करा, मस्तीही करा; पण अभ्यासात उत्कृष्ट यश मिळवून शाळा, क्लासेस आणि शिक्षकांचे नाव उज्ज्वल करा."

या प्रसंगी क्लासमध्ये आयोजित विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, पदके व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास अखिल भारतीय मराठा महासंघ, मुंबईचे पदाधिकारी श्री. अशोक देसाई, श्री. शंकरराव मोहिते, श्री. पंढरीनाथ यादव श्री. सचिन शिंदे व श्री. चंद्रकांत पोटे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. पारितोषिक वितरणानंतर विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. शेवटी सर्व मान्यवर, विद्यार्थी व पालकांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन सुभाष बामणे (एस.ई.ओ.), संचालक, साहिल ट्यूशन क्लासेस, खार दांडा तसेच शैक्षणिक विभाग प्रमुख, अखिल भारतीय मराठा महासंघ, मुंबई यांनी केले.

# नागपूर विभागीय तंत्र प्रदर्शनी 2026 यशस्वी उद्घाटन सोहळा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** :कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागामार्फत तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखाली राज्यभर जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या तंत्र प्रदर्शनी उपक्रमाचा एक भाग म्हणून आज नागपूर विभागीय तंत्र प्रदर्शनीचे भव्य उद्घाटन संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या प्रदर्शनीत नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमधून एकूण ४८ मॉडेल्सचा सहभाग होता. इंजिनिअरिंग, नॉन- इंजिनिअरिंग आणि इनोव्हेटिव्ह या विविध क्षेत्रांतील विद्यार्थ्यांनी "इंडस्ट्री बेस्ट चॅलेंज" या संकल्पनेवर आधारित उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण मॉडेल्स सादर केले मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपली तांत्रिक कौशल्ये आणि नवकल्पना सादर केल्या. या प्रदर्शनीचे



उद्घाटन पी. मोहन अध्यक्ष, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन हिंगणा यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पि.टी. देवतळे सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय नागपूर हे होते. कार्यक्रमाला मोहित देशपांडे (STRIVE HR Head), अरुण लांजेवार, योगेश खेराडे, सुमित डबरासे, रुपेश माकडे तसेच संस्थेच्या उपसंचालिका श्वेता कुलकर्णी, उपप्राचार्या श्रीमती पंडिले, जिल्हा व्यवसाय शिक्षण निरीक्षक लाकडे साहेब व शंभरकर (DVO वर्धा) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्व उत्कृष्ट मॉडेल्सचे कौतुक करत देशासमोरील सध्याच्या आव्हानांचा विचार करून इनोव्हेटिव्ह, कन्स्ट्रक्टिव्ह आणि इंडस्ट्री-ओरिएंटेड प्रकल्प विकसित करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी स्टार्टअप, स्वयंरोजगार आणि रोजगार निर्मिती करणारे प्रकल्प उभारून देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान द्यावे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. या स्पर्धेतून उत्कृष्ट नऊ मॉडेल्सची निवड करण्यात येणार असून ती राज्यस्तरीय तंत्र प्रदर्शनीमध्ये सहभाग घेणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सर्व अधिकारी,सर्व गटनिदेशक NSS कार्यक्रमाधिकारी, शिल्पनिदेशक, कर्मचारीवर्ग व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

तसेच विभागातील विविध संस्थांमधून आलेल्या शिल्पनिदेशक व विद्यार्थ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.नागपूर विभागीय तंत्र प्रदर्शनीने विद्यार्थ्यांच्या कौशल्य, सर्जनशीलता आणि नवोन्मेषी विचारसरणीचा उत्कृष्ट प्रत्यय देत भविष्यातील तंत्रज्ञ भारताची झलक साकारली. सहदेव चव्हाण यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले.

# वाहतूक नियमांचे पालन : राष्ट्रविकासाची पायाभरणी

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये आपल्या देशातील कोणताही कायदा हा लोकनियुक्त प्रतिनिधींकडूनच केला जातो. कोणत्याही प्रशासकीय यंत्रणेला स्वतंत्रपणे कायदे करण्याचा अधिकार नाही (भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनात्मक अधिकारांचा अपवाद वगळता). त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेले वाहतूकविषयक कायदे व नियम हे जनतेच्या सरकारने जनतेसाठी केलेले आहेत. हे कायदे "पोलिसांचे" नसून ते संपूर्ण समाजाच्या सुरक्षिततेसाठी आहेत, हे सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे.

सरकारने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध लोकसेवक नेमलेले असतात. पोलीस हे त्यातील एक महत्त्वाचा घटक आहेत. त्याचप्रमाणे आरटीओ, कस्टम, आयकर विभाग, महसूल, नगरविकास, वनविभाग इत्यादी शासकीय विभागही आपापल्या क्षेत्रात कायद्याची अंमलबजावणी करतात.

वाहतूक नियमभंगाबाबत 'तडजोड शुल्क' (दंड) आकारण्याची तरतूद आहे. अशी तरतूद इतर काही कायद्यांमध्येही आढळते. वाहतूक नियमांचे पालन हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित असल्याने शासनाने ही तरतूद केलेली आहे. तथापि, कोणालाही जबरदस्तीने दंड भरण्यास भाग पाडले जात नाही. जर आरोप मान्य नसतील, तर संबंधित व्यक्तीस न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जाण्याचा पूर्ण अधिकार आहे. न्यायालयीन खटले चालविणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून न्याय व विधी विभागही त्यात सक्षम आहे. मनुष्यबळाच्या कमतरतेचे कारण देऊन कायद्याची अंमलबजावणी अशक्य आहे असे म्हणणे योग्य ठरत नाही.

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दंडाची रक्कम. वाहतूक नियमभंगातून जमा होणारी रक्कम ही कधीही पोलिस विभागासाठी नसते आणि सध्याही नाही. ती विहित कालावधीत शासनाच्या तिजोरीत जमा केली जाते. त्या रकमेचा कोणताही भाग पोलिस विभागाच्या वापरासाठी उपलब्ध नसतो. वाहतूक अंमलबजावणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी या निधीतील काही हिस्सा द्यावा, अशी मागणी शासनाकडे प्रलंबित आहे; मात्र अद्याप त्यास मान्यता मिळालेली नाही.

आज वाढत्या लोकसंख्येसह वाहतूक आणि दळणवळण यांचे सुरक्षित, शिस्तबद्ध व नियमाधीन व्यवस्थापन अत्यंत आवश्यक झाले आहे. रस्ते अपघातांमध्ये होणारे मृत्यूचे प्रमाण अत्यंत चिंताजनक आहे. भारतात साधारणतः दर चार मिनिटांनी एक तरुण (वयोगट १८ ते ४०) रस्ते अपघातात मृत्युमुखी पडतो. रस्ते अपघातांमुळे होणारे मृत्यू अनेकदा युद्धे, नैसर्गिक आपत्ती किंवा महामारींपेक्षाही जास्त असतात. विशेषतः तरुण, कमावत्या वर्गातील व्यक्तींचे प्रमाण अधिक असल्याने राष्ट्राचे उत्पादक आणि प्रतिभासंपन्न मनुष्यबळ गमावले जाते.

२००० ते २०२५ या कालावधीत नैसर्गिक आपत्ती, दहशतवादी हल्ले आणि महामारींमुळे झालेल्या मृत्यूंची तुलना केली असता रस्ते अपघातांचे प्रमाण सातत्याने मोठे राहिले आहे. दरवर्षी सुमारे १.५ ते १.७ लाख मृत्यू रस्ते अपघातांत नोंदवले जातात. आर्थिक नुकसानही मोठ्या प्रमाणावर होते, ज्याचा परिणाम देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नावर (GDP) होतो.

२०२२ ते २०२४ या तीन वर्षांत रस्ते अपघातांची संख्या वाढत गेली. ओव्हरस्पीडिंग हे प्रमुख कारण आढळले. दोनचाकी वाहनधारक व पदचारी हे सर्वाधिक बळी ठरले. दररोज सरासरी ४५० पेक्षा अधिक लोक मृत्युमुखी पडतात. या अपघातांमुळे वैद्यकीय खर्च, उत्पादकतेत घट आणि राष्ट्रीय संपत्तीची हानी होते.दुर्दैवाने, अपघातानंतर काही ठिकाणी वाहनांची जाळपोळ, रास्ता रोको किंवा दगडफेक यांसारख्या प्रतिक्रिया दिल्या जातात. याउलट, जर आपणच स्वयंप्रेरणेने वाहतूक नियमांचे पालन करण्याचा संकल्प केला, तर अपघातांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. आपल्या सुरक्षित भविष्यासाठी प्रयत्न आपल्यालाच करावे लागतील.

जर वाहतूक नियमांचे पालन आपल्या सवयीचा भाग झाले, तर:

मुले सुरक्षितपणे शाळेत पोहोचतील.

ज्येष्ठ नागरिक निर्धास्तपणे प्रवास करू शकतील.

रुग्णवाहिका व अग्निशमन दलाला तात्काळ रस्ता उपलब्ध होईल.

राष्ट्रीय संपत्तीचे संरक्षण होईल.

वाहतूक पोलीस : वर्दीतील 'देवदूत'

दंडात्मक कारवाईमुळे कधी कधी पोलिसांविषयी नकारात्मक भावना निर्माण होतात. परंतु भर उन्हात, पावसात आणि प्रदूषणात उभे राहून वाहतूक सुरळीत ठेवणारे हेच कर्मचारी असतात. अपघातानंतर जखमींना तात्काळ रुग्णालयात पोहोचवणारा पहिला मदतनीस अनेकदा वाहतूक पोलीसच असतो. ते कायद्याचे रक्षकच नव्हे, तर समाजाचे संरक्षकही आहेत.

आपली जबाबदारी : एक संकल्प

वाहतूक नियमांचे पालन करणे म्हणजे:

दंड टाळणे नव्हे, तर जीव वाचवणे.

राष्ट्राचे भविष्य सुरक्षित करणे.

आणीबाणीच्या सेवांना प्राधान्य देणे.

आर्थिक नुकसान टाळणे.

**निष्कर्ष**

वाहतूक नियमांच्या वाढलेल्या दंडावर टीका करण्यापेक्षा त्या नियमांची आवश्यकता का निर्माण झाली याचा विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे. दंडाच्या भीतीने नव्हे, तर सुरक्षिततेच्या सवयीने वाहन चालवूया. स्वतः नियम पाळूया आणि इतरांचे प्रबोधन करूया.

शिस्तबद्ध, सुरक्षित आणि जबाबदार भारत घडविण्यासाठी वाहतूक नियमांचे मनापासून पालन करूया.



**जय हिंद!**
**बजरंग बनसोडे**
**(पोलीस अधीक्षक)**

# संजीवन तज्ञांची मुंबईत परिषद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** प्रत्येक हृदय शस्त्रक्रियेमागे एक डॉक्टर टीम असते आणि त्या टीमच्या केंद्रस्थानी परफ्यूजनिस्ट ( संजीवनी तज्ञ ) असतो, जो पेशंटचे हृदय चालू आहे की नाही याची खात्री करत असतो. ऑपरेशन झाल्यानंतर डॉक्टर टीम निघून जाते. मात्र परफ्यूजनिस्ट ( संजीवनी तज्ञ ) पेशंट शुद्धीवर येईपर्यंत असतो. त्यांची सध्या देशात संख्या फार कमी आहे. ती कशी वाढेल यासाठी इंडियन सोसायटी ऑफ एक्स्ट्राकॉर्पोरियल टेक्नॉलॉजीची २६ वी वार्षिक परिषद मुंबईत सुरू झाली आहे. इंडियन सोसायटी ऑफ एक्स्ट्राकॉर्पोरियल टेक्नॉलॉजी ची २६ वी वार्षिक राष्ट्रीय परिषद आघाडीच्या कार्डियाक केअर तज्ञ, परफ्यूजनिस्ट, आरोग्यसेवा व्यावसायिक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबईत सुरू झाली. परिषदेचे नेतृत्व आय एस इ सी टी चे अध्यक्ष राजेंद्र कोकणे लोकनाथ तिवारी, जगन्नाथ काळुगडे, विकास माळी, रवींद्र सावर्डेकर, शशिकांत मेमाणे , योगेश लुडबे, रफिक शेख, आयसेक्टॉनचे सचिव रवींद्र सावर्डेकर यांच्यासह वरिष्ठ कार्यकारी सदस्य करत आहेत.

# श्री गणपती मराठी शाळेत 20 प्रयोगांची झंझावाती मांडणी

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने भोकरदन शहरातील श्री. गणपती मराठी शाळेत शनिवारी (दि. 28 फेब्रुवारी 2026) भव्य विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले. "ज्ञानातून प्रगती" या मंत्रास साजेशी 20 प्रयोगांची मांडणी करून इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा ठसा उमटवला.प्रदर्शनाचे उद्घाटन माजी नगरसेवक संतोष अन्नदाते यांच्या हस्ते झाले.यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकाचे पती रमेश जाधव,शाळेचे मुख्याध्यापक शास्त्री सर,शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचत, पाणी व्यवस्थापन, सौरऊर्जा, विद्युत परिपथ,पर्यावरण संवर्धन यांसारख्या विषयांवरील प्रयोग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक प्रयोगामागील वैज्ञानिक तत्त्वे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने समजावून सांगितली हेच या उपक्रमाचे यशया उपक्रमासाठी विज्ञान शिक्षिका एस. बी.दळवी व डी. ए.पळशीकर मॅडम यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांत संशोधनाची जिज्ञासा आणि प्रयोगशीलता अधिक बळावली.

# पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघाच्या वतीने २१ गरीब आणि गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ,पनवेल येथे २१ गरीब आणि गरजू महिलाना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. औचित्य होते पनवेल नवी मुंबई-पत्रकार संघाचे अध्यक्ष मयुर तांबडे यांच्या वाढदिवसाचे. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक प्रथमेश सोमण, भाजपचे मा. सहसंयोजक-




सांस्कृतिक सेलचे सुनील सिन्हा, सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे, पंडित मोहन जोशी, नगरसेवक सुमित झुंजारराव, भावना ग्रुपच्या अपर्णा शहा, सामाजिक कार्यकर्ते योगेश




तांबोळी, हर्षला तांबोळी, डॉ. लक्ष्मीकांत निकम, शाहिद भाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गेल्या वर्षी या पत्रकार संघाकडून आदिवासी आणि गरीब विद्यार्थ्यांना ३३ सायकलचे वाटप करण्यात आले होते. याचबरोबर शालेय साहित्य वह्यापेन, दप्तर




आदींचेही वाटप केले आहे. सर्वच उपस्थित मान्यवरांनी मयूर तांबडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन पनवेल-नवी मुंबई पत्रकार संघाचे कौतुक केले. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अध्यक्ष मयूर तांबडे याना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पुढची 63 वर्ष वाढदिवस जल्लोषात




साजरा करावा अशा शुभेच्छा दिल्या. मयुर तांबडे यांनी आपल्या परीने समाजाला काहीतरी देण्याचा नवा धडा आपल्या सहकाऱ्यांना दिला आहे. पत्रकार हा समाजाचा आरसा असतो, समाजाने प्रगती केली पाहिजे ही प्रत्येकाची इच्छा आहे. समाजावर होणाऱ्या अन्याया विरोधात आवाज उठवण्यासाठी पत्रकाराची भूमिका महत्त्वाची असते. पनवेल- नवी मुंबई पत्रकार संघातर्फे करण्यात येणारी समाजसेवा मयूर तांबडे हे सर्वांना सोबत घेऊन करत आहेत ते सर्वांसाठी अनुकरणीय असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. असे कार्यक्रम यापुढे देखील सातत्याने चालू राहावेत आणि संघटनेचे कार्य इतरांना प्रेरणा घेता याव्यात अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या. भावना ग्रुपच्या अपर्णा शहा यांनी देखील या उपक्रमाचे कौतुक करत पुढच्या वेळेला आम्ही देखील यात सहभागी होऊ असे आश्वासन दिले. डॉ. गिरीश गुणे यांनी देखील आपल्या भाषणात पनवेल- नवी मुंबई पत्रकार संघटनेचे आभार मानले आणि संघटना करत असलेल्या समाजसेवेबद्दल विशेष कौतुक केले.यावेळी उपाध्यक्ष दिपक कांबळे, सचिव लालचंद यादव, खजिनदार मिलिंद खारपाटील, सदस्य रमेश भोळे, अशोक गोरडे, दीपक जगे, समीर वेश्विकर, पंकज तांबडे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी अनेक पत्रकार उपस्थित होते. यावेळी कवी अशोक घरत यांनी कवितेचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण मोहोकर यांनी केले.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नगरसेवक मनोज भुजबळ यांच्या निवासस्थानी दिली सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** देशाचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री माननीय नितीन गडकरी हे शनिवारी पनवेल मध्ये पिल्लेज कॉलेजच्या पदवीदान समारंभाला आले होते. यावेळी त्यांनी पनवेल महापालिकेचे नगरसेवक ॲडव्होकेट मनोज भुजबळ यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी,



पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, नगरसेवक प्रकाश बिनेदार, सुमित झुंझारराव, यांच्यासह अनेक मान्यवर नगरसेवक आणि भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. या भेटीदरम्यान नितीन गडकरी यांनी भुजबळ कुटुंबातील सदस्यांची विचारपूस करत सर्वांना शुभेच्छा दिल्या तसेच मनमोकळी चर्चा केली.

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग निलंबितविधानसभेच्या कामकाजाचा अवमान केल्याप्रकरणी कारवाई

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका :** विधानसभेच्या कामकाजाला गृहीत धरत मंत्र्यांच्या ब्रिफिंगला अनुपस्थित राहणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग यांना चांगलेच महागात पडले आहे. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी ब्रिफिंगसाठी बोलावूनही ते गैरहजर राहिल्याने सभागृहात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे सांगत आक्रमक भूमिका मांडली. विधानसभेच्या कामकाजात अडथळा निर्माण होणे आणि मंत्र्यांना आवश्यक माहिती न देणे हा सभागृहाचा अवमान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तालिका सभापती दिलीप लांडे यांच्या निर्देशानुसार २७ फेब्रुवारी रोजी एम. देवेंद्र सिंग यांना तात्काळ निलंबित करण्यात आले. ही घटना केवळ प्रशासकीय




निष्काळजीपणा नसून विधानसभेच्या सार्वभौमत्वाचा अपमान असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सिंग यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्तावही दाखल केला असून हे प्रकरण विशेषाधिकार समितीकडे पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही या घटनेची दखल घेत पुढील कडक कारवाईचे संकेत दिले आहेत. या कारवाईमुळे शासकीय अधिकाऱ्यांनी विधानसभेच्या कामकाजाबाबत जबाबदारी व शिस्त पाळण्याचा स्पष्ट संदेश प्रशासनाला मिळाल्याचे मानले जात आहे.

## दिल्लीत चमकणार नागपूरची दिपाली: 'लाईनमन दिनी' राष्ट्रीय स्तरावर होणार गौरव

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग :** 'लाईनमन' या शब्दाचा अर्थ नेहमीच पुरुष कर्मचाऱ्याशी जोडला गेला आहे, परंतु नागपूरच्या महावितरणमध्ये कार्यरत असलेल्या दीपाली खोब्रागडे यांनी आपल्या कामातून आणि जिद्दीतून हा समज मोडीत काढला आहे. येत्या ४ मार्च रोजी 'लाईनमन दिना'निमित्त नवी दिल्ली येथे आयोजित एका विशेष सोहळ्यात दीपाली यांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात येणार आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) आणि टाटा पॉवर-DDL यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात महाराष्ट्रातून निवडलेल्या चार कर्मचाऱ्यांमध्ये दीपाली या एकमेव महिला असून, ही बाब नागपूरकरांसाठी आणि महावितरणसाठी अभिमानास्पद आहे. दीपाली खोब्रागडे यांचा महावितरणमधील १२ वर्षांचा कार्यप्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात सात वर्षे ग्रामीण भागातील आव्हानात्मक परिस्थितीत काम करून केली, तर गेल्या




पाच वर्षांपासून त्या नागपूर शहरातील महाल विभागांतर्गत जुन्या शुक्रवारी वितरण केंद्रात वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत.

वीज वितरण व्यवस्थेतील तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यापासून ते वीज बिलांची वसुली आणि ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा सुनिश्चित करण्यापर्यंतच्या जबाबदाऱ्या त्या अत्यंत सक्षमपणे पार पाडत आहेत.

दीपाली यांचे कार्य केवळ तांत्रिक नसून ते मूल्यांवर आधारित आहे. सुरक्षिततेला त्यांनी आपल्या कामात सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. "सुरक्षा साधनांशिवाय काम करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण आहे, त्यामुळे स्वतःच्या आणि सहकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पीपीई किटचा वापर करणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे," असे त्या सांगतात. ग्राहकांच्या घरातील अंधार दूर करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे हेच आपल्या कामाचे मुख्य प्रेरणास्थान असल्याचे त्या मानतात.

याशिवाय, महावितरणच्या स्मार्ट मीटर योजना आणि सौर ऊर्जा प्रकल्पांसारख्या आधुनिक बदलांना त्यांचा पूर्ण पाठिंबा आहे.

तांत्रिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या दीपाली यांची ही कामगिरी भविष्यात अनेक तरुणींना या क्षेत्रात येण्यासाठी नक्कीच प्रोत्साहन देणारी ठरेल.

## लोहारी खुर्द येथे विज्ञान दिनानिमित्त शाळास्तरीय विज्ञान प्रदर्शनी उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी/अकोट:** राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळा लोहारी खुर्द येथे शाळास्तरीय विज्ञान प्रदर्शनी उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित व्हावा आणि विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने विज्ञान शिक्षिका सोनाली निचळ यांच्या संकल्पनेतून या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित नाविन्यपूर्ण मॉडेल सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापक नितीन धोरण यांच्या हस्ते नोबेल पारितोषिक विजेते भारतरत्न डॉ सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी शिक्षिका सोनाली निचळ यांनी विज्ञान हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून दैनंदिन जीवनाशी जोडलेले आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. मुख्याध्यापक नितीन धोरण यांनी विज्ञानामुळे मानवी जीवन अधिक सुलभ



झाले असून विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा दूर ठेवून वैज्ञानिक विचारसरणी स्वीकारण्याचे आवाहन केले. तर रुपाली ढवळे यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.

प्रदर्शनीत विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत विविध विषयांवर आधारित कमी खर्चात तयार करता येणारी २४ उपयुक्त वैज्ञानिक उपकरणे सादर केले. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांचे सादरीकरण आत्मविश्वासाने करत त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे सोप्या व प्रभावी भाषेत समजावून सांगितली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल आत्मविश्वास वाढण्यासोबतच प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाल्याचे शिक्षकांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शापोआ कर्मचारी भुजिंगराव इंगळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचा पदवी वितरण समारंभाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या विद्यार्थ्यांचा पदवी वितरण समारंभ 28 फेब्रुवारी रोजी भारत सरकारचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक आणि मान्यवर उपस्थित होते.

मुंबई विद्यापीठ संलग्नतेअंतर्गत पदवीधर बॅचेससाठी हा अंतिम पदवी वितरण कार्यक्रम असल्याने या समारंभाचे विशेष महत्त्व आहे, जो पिल्लई विद्यापीठाच्या रूपात संस्था आपल्या नवीन अध्यायात प्रवेश करत असताना दशकांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा आणि संस्थात्मक वारशाचा कळस दर्शवितो. यावेळी बोलताना गडकरी यांनी संपूर्ण भारतात होत असलेल्या अभूतपूर्व





पायाभूत सुविधांच्या परिवर्तनाबद्दल आणि देशाच्या वेगवान विकासाच्या मार्गाबद्दल सांगितले. आगामी राष्ट्रीय पायाभूत सुविधा आणि विकास कॉरिडॉरमध्ये पनवेल हे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून एक महत्त्वाचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित केले, पिल्लई विद्यापीठासारख्या संस्था या वाढीच्या केंद्रस्थानी उभे राहण्यासाठी आणि दर्जेदार शिक्षणाद्वारे राष्ट्र उभारणीत योगदान देण्यासाठी अद्वितीय स्थानावर आहेत हे त्यांनी नमूद केले. नवी मुंबईतील पहिली राज्य खाजगी विद्यापीठ म्हणून ओळख असलेल्या पिल्लई युनिव्हर्सिटी तर्फे 2025




च्या पदवीधर विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी हा भव्य सोहळा असल्याचं यावेळी मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले.

या कार्यक्रमाला जीईएमएस एज्युकेशन इंडियाचे सीईओ फ्रान्सिस जोसेफ; उरणचे आमदार महेश बालदी, महात्मा एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, सचिव डॉ. डॅफ्ने पिल्लई, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रियम पिल्लई, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रनव पिल्लई, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. निवेदिता श्रेयांस, संचालक डॉ. प्रज्ञेश शाह, महापौर नितीन पाटील, अविनाश कोळी, नगरसेवक मनोज भुजबळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. या समारंभात नितीन गडकरी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे वैयक्तिकरित्या प्रदान केली, ज्यामुळे पदवीधर बॅच आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी हा क्षण अधिक संस्मरणीय आणि प्रेरणादायी बनला. डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई यांनी गडकरी यांना त्यांचे एज्युकेशन पुस्तक भेट दिले, जे शिक्षण, राष्ट्र-निर्माण, संस्थात्मक नेतृत्व आणि भारताच्या भविष्याला घडवण्यात दर्जेदार उच्च शिक्षणाची परिवर्तनकारी भूमिका यावरील त्यांचे दृष्टिकोन प्रतिबिंबित करते.

## मुलांच्या क्षमता आणि आवड ओळखून मुलांना उच्च शिक्षण द्या : श्रीनिवास हजारे सर

**दैनिक युवक आधार**

**मंठा.प्रतिनिधी.नामदेव. मंडपे :** वाई या ठिकाणी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना भविष्यातील संधी आणि करियर मार्गदर्शन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करत असताना द प्रयाग सायन्स अकॅडमी जालना तसेच स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी मुलींची निवासी अकॅडमी वाटुर चे संचालक श्री श्रीनिवास हजारे सर बोलत होती त्यांनी आपल्या मुलांच्या क्षमता ओळखून आणि त्यांची आवड ओळखून त्याला कोणत्या शाखेमध्ये शिक्षण घ्यावे तसेच इतर मुलांसोबत त्याची तुलना करणे थांबवावे मुलांच्या प्राथमिक शिक्षणापासून



त्यावर पालकांचे लक्ष असावे याबरोबरच गावचे प्राथमिक शाळा यामध्ये राजकारण न करता मुलांच्या गुणोत्तेवरती गावकऱ्यांनी लक्ष द्यावे दहावी बारावीनंतर कोणत्या क्षेत्रामध्ये मुलांनी आपली प्रगती करावी यासाठी आपले कोणते विषय चांगले असावे यावरती ते बोलल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी मुलांनी व मुलींनी भरपूर प्रश्न वरती त्यांच्यासोबत चर्चा केली कार्यक्रम धनंजय उबाळे सर यांनी आयोजित केलेला होता . त्याचबरोबर गावातील सरपंच श्रीमती पार्वती बाई ठाकरे उपसरपंच.ग्रामपंचायत उत्तमराव उबाळे. सुखदेव गायकवाड. कैलास निमट. शिवाजी जंजिरे. परमेश्वर उबाळे. पीडी उबाळे.शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उज्वला ज्ञानेश्वर आरसूळ. योगेश उबाळे. पत्रकार रामेश्वर उबाळे. नामदेव मंडपे. सोसायटी. चेअरमन. विनायकराव मंडपे.गावातील प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठी भाषा गौरव दिन कवी संमेलन व शेरोशायरीने संपन्न

## मराठी भाषेच्या जतन-संवर्धनाचा निर्धार, महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी/गुरुनाथ तिरपणकर** : महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ ( MMMPS ) या अखिल महाराष्ट्रातील अग्रगण्य पत्रकार संघटना ही संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय अशोक तोडणकर यांनी २००१ साली स्थापन करत समाजासाठी अनेक वर्षे त्यांनी काम करत त्यांच्या पश्चात आप्पासाहेब तोडणकर यांनी ती कार्यरत ठेवली व पत्रकार संघचे सध्याचे अध्यक्ष प्रकाश पाटकर यांच्या व अनेक पत्रकार बांधवांच्या माध्यमातून सध्या सामाजिक कार्य करत आहे, महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ च्या २५ व्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करत कवी संमेलन, शेरोशायरी व भावगीतांचा बहारदार कार्यक्रम उत्साहात व दिमाखात लोअर परळ येथील आर्य समाज हॉल येथे शुक्रवार दिनांक २७,फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजता या वेळेत संपन्न झाला, आर्य समाज हॉल येथे रंगलेल्या या साहित्य मैफलीला साहित्यप्रेमी, पत्रकार,कवी-लेखक व नागरिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली, या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे भायखळा मतदारसंघातील नगरसेवक रोहिदास लोखंडे,ज्येष्ठ कवी व माजी शिक्षणाधिकारी डॉ. जिवबा रामचंद्र केळुसकर, कवयित्री लेखिका व दैनिक "मुंबई मित्र" च्या संपादिका सौ.अनघा अशोक राणे, संघाचे अध्यक्ष प्रकाश पाटकर,उपाध्यक्ष ॲड.सुनील शिर्के,प्रमुख कार्यवाहक अशोक भोसले, सहसचिव शशिकांत सावंत यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली,दीपप्रज्वलन करून आचार्य बाळशास्त्री जांभेकर तसेच संघटनेचे संस्थापक स्वर्गीय अशोक तोडणकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश वसंत पाटकर यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध साहित्यिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.प्रमुख पाहुणे डॉ.जिवबा रामचंद्र केळुसकर यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेचा अभिमान व्यक्त करत “प्रत्येकाने मराठी बोलले पाहिजे; मला मराठीने खूप काही दिले,” असे सांगितले. मराठी ही केवळ व्यवहाराची भाषा नसून ती संस्कार,विचार आणि आत्मसन्मान जपणारी मातृभाषा आहे असे ते म्हणाले. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याचा फायदा मला जीवनात



झाल्याचं त्यांनी सांगत लहान मुलांची मराठीत बोलले पाहिजे,घराघरात त्यांना संस्कृत श्लोक शिकवले पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

कवयित्री व लेखिका,संपादिका सौ.अनघा राणे यांनी मराठी भाषेमुळे आपण संस्कार,परंपरा आणि आपुलकीची नाळ जपत आलो आहोत असे सांगितले.भाषेमुळे समाजात परस्पर सहकार्य, बंधुभाव आणि सांस्कृतिक ऐक्य वृद्धिंगत होते असे त्यांनी नमूद केले.भारतीय जनता पार्टीचे भायखळा येथील नगरसेवक रोहिदास लोखंडे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करत केंद्र शासन व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. मराठी भाषेच्या समृद्ध इतिहासाला मिळालेला हा सन्मान संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात मान्यवरांनी मराठी भाषेचा गौरव,तिची समृद्ध संस्कृती,प्रतिष्ठा, परंपरा आणि आधुनिक युगातील महत्त्व अधोरेखित केले.या कवी संमेलनात अनेक कवी व कवयित्रींनी सहभाग घेतला कवी अशोक सुकाळे, सौ विद्या डोंबे, ॲड.सोपान बुडबाडकर,सौ सोनाली जगताप,सौ गीतांजली वाणी, श्रीमती गीताश्री नाईक, सौ सुनीता काटकर, श्री अशोक पुंडलिक उर्फ भाई नार्वेकर, सु. ना सरपडवळ, डॉक्टर शैलजा करोडे, प्रभू अग्रहारकर,डॉ.रेवती आळवे,डॉ. खं रा माळवे, ॲड. बाळासाहेब तोरस्कर, बबन येरम,यासह अनेकांनी कविता सादर केली, जागतिकीकरणाच्या युगात विविध भाषांचा स्वीकार करतानाच मातृभाषेचे जतन आणि संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

मराठी भाषेतील शब्दसंपदा, साहित्यवैभव,संत परंपरा, समाजसुधारकांचे विचार आणि आधुनिक पत्रकार,कवी,लेखक योगदान यामुळे मराठी ही संस्कारी,शौर्य निर्माण करणारी भाषा असल्याचे अधोरेखित करण्यात आले.विविध कवींच्या प्रभावी कविता, शेरोशायरी आणि भावगीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले,मराठी भाषेच्या माधुर्याचा आणि अभिव्यक्तीच्या सामर्थ्याचा अनुभव या कार्यक्रमातून सर्वांना मिळाला.

संघटनेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणी व सल्लागारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले,कवी संमेलनात सहभागी झालेल्या कवींचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मानचिन्ह, सन्मानपत्र,शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्ष प्रकाश पाटकर, उपाध्यक्ष सुनील शिर्के, सचिव अशोक विठ्ठल भोसले आणि सहसचिव शशिकांत सावंत यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

सदर कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार,कृष्णा काजरोळकर (सल्लागार ),गुरुनाथ तिरपणकर( सल्लागार), जगन्नाथ कामत( सल्लागार),छाया गचके(खजिनदार),डॉ.सूर्यभान डोंगरे (संयुक्त कार्यवाह),आप्पासाहेब जगदाळे(कार्यकारिणी सदस्य), (आण्णासाहेब आहेर ( कार्यकारिणी सदस्य)अशोक लांडगे ( कार्यकारणी सदस्य ),रवी नानचे ( कार्यकारणी सदस्य )यासह अनेक सदस्य व सहयोग व्यक्तिमत्त्वांचा सहयोग कार्यक्रमाला लाभला,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा काळे यांनी प्रभावीपणे केले, कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या खजिनदार श्रीमती छाया गचके यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले,

मराठी भाषा दिनानिमित्त पार पडलेला हा काव्यमय सोहळा मराठी भाषेचा अभिमान जागवणारा,तिच्या वैभवशाली परंपरेची जाणीव करून देणारा आणि नव्या पिढीला मातृभाषेच्या जतन-संवर्धनासाठी प्रेरणा देणारा ठरला.

# महात्मा फुले चौकात पाणी पाईपलाईन फुटली; नागरिक त्रस्त – एकहाती सत्ता असूनही प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड | प्रतिनिधी/ योगेश चौदंते** : मुदखेड शहरातील वार्ड क्रमांक ४ मधील महात्मा फुले चौक परिसरात पिण्याच्या पाण्याची मुख्य पाईपलाईन फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहत असून नागरिकांना गंभीर त्रास सहन करावा लागत आहे. भोकर रोड ते आबादी रोड मोंढ्यात जाणारा रोड दरम्यान ही समस्या अनेक दिवसांपासून कायम असूनही नगरपालिका प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून दखल घेतली जात नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.फुटलेल्या पाईपलाईनमधून सतत



पाणी गळती होत असल्याने रस्त्यावर पाणी साचत आहे. त्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या अंगावर पाण्याचे शिंतोडे उडत असून विशेषतः शाळकरी विद्यार्थी, पादचारी व दुचाकीस्वारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे अपघाताचा धोका देखील वाढला आहे.उन्हाळ्याची सुरुवात होत असताना शहरात नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होत नसून एक दिवसाआड पाणी दिले जात आहे. एका बाजूला नागरिकांना पाण्याची टंचाई भासत असताना दुसऱ्या बाजूला हजारो लिटर पाणी वाया जात असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नगरपालिकेकडून पाणीपट्टी व इतर कर आकारले जात असले तरी मूलभूत सुविधा मात्र वेळेवर मिळत नाहीत. वार्ड क्रमांक ४ मधील अनेक विकासकामे प्रलंबित असून केवळ ठराविक फायद्याची कामेच प्राधान्याने केली जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.शहरात भारतीय जनता पार्टीची एकहाती सत्ता असताना देखील पाणीपुरवठा व मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नगराध्यक्ष तसेच संबंधित नगरसेवकांनी तात्काळ लक्ष देऊन फुटलेली पाईपलाईन दुरुस्त करावी व नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी केली आहे.

# स्वातंत्र्य सेनानी सखाराम बापू फदाट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद प्रतिनिधी/अशोक म्हस्के** : मराठवाडा मुक्ती संग्रामातील धगधगत्या पर्वाचे झुंजार नेतृत्व आणि तत्कालीन औरंगाबाद जिल्ह्याच्या राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्व, स्वातंत्र्य सेनानी सखाराम बापू फदाट यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी एका प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जनसेवा फाऊंडेशन व 'आरंभ फाऊंडेशन'चे प्रकाश शेळके यांच्याकडून बापूंच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य (पॅड व पेन) वाटून बापूंना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,बोरगाव येथे आयोजित या कार्यक्रमात मुख्याध्यापक भरत देशमुख यांनी सखाराम बापूंच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, "निजामशाहीच्या जोखडातून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी बापूंचे योगदान ऐतिहासिक



आहे. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी जिल्ह्याच्या सामाजिक व राजकीय जडणघडणीत सिंहाचा वाटा उचलला." यावेळी काळे सर आणि बेडवाल सर यांनीही बापूंच्या जीवनातील प्रेरक प्रसंगांचे कथन केले.आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. प्रदीप जोशी व प्रकाश शेळके भावूक झाले. "आम्हाला बापूंचा प्रदीर्घ सहवास लाभला नसला तरी, त्यांचे विचार आमच्यासाठी दीपस्तंभासारखे आहेत. त्याच विचारांच्या प्रेरणेतून आम्ही 'आरंभ' आणि 'जनसेवा' फाऊंडेशनच्या माध्यमातून समाजसेवा करत आहोत," असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. नवीन शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे मुलांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. "शिक्षणानेच उज्ज्वल भविष्य घडते," हा बापूंचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी सांगितले.यावेळी मुख्याध्यापक भरत देशमुख,गोपालसिंग बेडवाल, संजय निकम, राजेंद्र सोनवणे, राजेंद्र भुजबळ, प्रल्हाद काळे, शेवाळे सर , गायकवाड सर, मुळे सर ,आरंभ फाऊंडेशनचे प्रकाश शेळके,अमीन मिर्झा,डॉ. प्रदीप जोशी, जनसेवा फाऊंडेशनचे सुनील फदाट, हर्षल फदाट,सचिन फदाट,राहुल फदाट,पंकज फदाट,पंढरी गंगात्रे, भाऊसाहेब फदाट,दिनकर चव्हाण, भगवान फदाट, शुभम फदाट यांच्या सह तरुणांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

# वारसाहक्क नोकरीसाठी ठोस पाऊल ; दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा”

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड** : सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरी मिळावी या महत्त्वपूर्ण मागणीसंदर्भात दि. २६ फेब्रुवारी २०२६ मा. आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांची मा. माजी मंत्री प्रवीण प्रतापराव भोसले, रविंद्र प्रतापराव भोसले आणि कामगार नेते संतोष पवार यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी उपायुक्त रमाकांत गोसावी, मनोहर पाटील तसेच वारस प्रतिनिधी सुनील परब, गोपाळ सावंत आणि नितिन कदम उपस्थित होते.

बैठकीत शासनाचे विविध निर्णय, परिपत्रके तसेच मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ व संचालनालयाचे आदेश यांचा सखोल आढावा घेण्यात आला. संबंधित आदेश स्पष्ट असतानाही काही नगरपरिषदा व नगरपंचायतींकडून त्यांची अंमलबजावणी न करता विनाकारण दिरंगाई होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली.



या पार्श्वभूमीवर मा. आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांनी आदेशांचे पालन न करणाऱ्या नगरपरिषद व नगरपंचायतीतील आस्थापना प्रमुखांवर नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश देण्याचा निर्णय घेतला आहे. या ठोस भूमिकेमुळे राज्यभरातील सफाई कामगारांच्या वारसांना न्याय मिळण्याचा मार्ग अधिक सुलभ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.मा. आयुक्तांच्या न्यायाभिमुख आणि सकारात्मक भूमिकेबद्दल मा. माजी मंत्री प्रवीण प्रतापराव भोसले यांनी समाधान व्यक्त करत, या निर्णयामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

# मुंब्र्यात माणुसकीची 'ईदी' !खान कुटुंबियांकडून ८०० ते ८५० कुटुंबांना मोफत धान्य वाटप ! ; वाढत्या महागाईत खान परिवाराचा मोठा आधार

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत,कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : पवित्र रमजान महिना आणि ईद-उल- फितरच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) मुंब्रा-कळवा विधानसभा अध्यक्ष शमीम अहमद खान आणि धडाडीचे युवा नेते समीर शमीम खान यांनी सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श वस्तुपाठ सादर केला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही गरिबांची ईद गोड व्हावी,या उदात्त हेतूने मुंब्रा शहरातील तन्वर नगर येथील पक्ष कार्यालयात दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ८०० ते ८५० गरजू कुटुंबांना 'मोफत अन्नधान्य रेशनिंग किट'चे भव्य वाटप करण्यात आले.

सध्याच्या काळात महागाई गगनाला भिडलेली असताना सर्वसामान्यांना सण साजरा करणे कठीण जात आहे.अशा परिस्थितीत शमीम खान यांनी प्रत्यक्ष



जमिनीवर उतरून लोकांच्या गरजा पूर्ण करण्याचा विडा उचलला आहे.वाटप करण्यात आलेल्या किटमध्ये साखर,तेल, रवा,मैदा,शेवया आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असून यामुळे शेकडो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. केवळ घोषणाबाजी न करता प्रत्यक्ष कृती करण्याच्या त्यांच्या या कार्यपद्धतीचे सर्वत्र कौतूक होत आहे.

लोकांचे समाधान हीच आमची खरी ईदी"-समीर खान.याप्रसंगी तरुण पिढीचे नेतृत्व करणारे युवा नेते समीर शमीम खान यांनी आपल्या भावना व्यक्त करताना उपस्थितांची मने जिंकली.ते म्हणाले:

"वडिलांनी आम्हाला नेहमीच शिकवले
आहे की,कुणाचाही हक्क मारू नका;
गरिबांच्या सेवेतच खरी प्रगती आहे.
आम्ही केवळ माध्यम आहोत,
सर्वकाही देणारा तो अल्लाह आहे."

"ईद हा आनंदाचा सण असून तो तेव्हाच
पूर्ण होतो जेव्हा आपला शेजारीही
आनंदी असतो.समाजसेवा हा आमचा वारसा असून,लोकांच्या चेहऱ्यावर समाधान पाहणे हीच आमची खरी 'ईदी' आहे."

**उपक्रमाची खास वैशिष्ट्ये:**

•शिस्तबद्ध नियोजन:तन्वर नगर कार्यालयात गर्दी टाळण्यासाठी टोकन पद्धतीचा वापर करून अत्यंत शिस्तबद्धरीत्या वाटप करण्यात आले.

•सर्वसमावेशक मदत:जात-धर्म किंवा पंथ न पाहता,केवळ 'गरज' हा निकष लावून प्रत्येक गरजूपर्यंत ही मदत पोहोचवण्यात आली.

•कार्यकर्त्यांची मेहनत:शमीम अहमद खान यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या 'युवा फौजेने' रात्रदिवस मेहनत घेऊन या मोहिमेचे यशस्वी नियोजन केले.

*या मान्यवरांची उपस्थिती*

याप्रसंगी नूरी चौधरी,शायना आझमी, जुबेर अंसारी,डॉ.जावेद,जैद कांचे,सलीम खान,शोएब अली यांसह परिसरातील अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निफाडमध्ये १३ हजार कामगारांना गृहोपयोगी भांडेसेट व साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : नाशिक जिल्हा संघटित कामगार संघटना आणि महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक जिल्ह्यातील सुमारे १३ हजार बांधकाम कामगारांना गृहोपयोगी भांडेसेट तसेच दैनंदिन वापरातील साहित्याचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष शंकरराव वाघ यांनी दिली.

राज्य सरकारच्या योजनेअंतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना



भांडेसेट, साहित्य पेटी, बॅग तसेच कामासाठी आवश्यक साहित्य देण्यात येत आहे. या संचामध्ये बांधकामासाठी लागणारे साहित्य, सुरक्षा किट, जाळी, टॉर्च, हेल्मेट, जेवणाचा डबा, वस्तू ठेवण्यासाठी पेटी आदी उपयुक्त वस्तूंचा समावेश आहे. या साहित्यामुळे कामगारांना त्यांच्या दैनंदिन कामात मोठी मदत होत असल्याचे सांगण्यात आले.भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष तथा नोंदणीकृत संघटित कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांच्या विशेष प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील १३ हजार कामगारांना आतापर्यंत साहित्याचे वितरण पूर्ण झाले आहे. यानंतर दुसऱ्या टप्प्यात आणखी ५ हजार कामगारांना साहित्य वाटप करण्यात येणार असल्याची माहितीही वाघ यांनी दिली.

या उपक्रमासाठी कामगार उपायुक्त विना माळी यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे वाघ यांनी नमूद केले. तसेच संघटनेचे गौरव वाघ, शुभम गवळी, वैभव निर्भवणे, अंबादास डेंगळे, विठ्ठल गांगुर्डे, रंगनाथ सानप, राजाराम सानप, पूनम गावरे, कांचन पवार, रुपाली पराळकर, अनिता जमधडे आणि गौरव पगारे यांनी साहित्य वाटपासाठी सक्रिय योगदान दिले.

या उपक्रमामुळे नाशिक जिल्ह्यातील बांधकाम कामगारांना मोठा दिलासा मिळाला असून राज्य सरकारच्या योजनांचा लाभ तळागाळातील कामगारांपर्यंत पोहोचत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# स्वरनाद" ग्रुप द्वारा 'सिलसीला- ये- इश्क' या हिंदी गीतांची विशेष प्रस्तुती

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी, राहुल मडावी**




**नागपूर :** सायंटिफिक सभागृह, आठ रस्ता चौक, नागपूर येथे घेण्यात आलेल्या या सुमधुर हिंदी गीतांच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष, किरण खोरगडे तसेच उपाध्यक्ष, आनंद ढोबळे यांच्या नियोजनात पार पडला. या विशेष कार्यक्रमाचे उत्कृष्ट संगीत पंकज सिंग आणि चमू यांनी दिले होते. 31 लोकप्रिय अशा सुमधुर गीतांची प्रस्तुती किरण खोरगडे, आनंद ढोबळे, शशिकांत पोचलवार, सोनाली मस्के, सुशील मस्के, हर्षदा हेडावू, आर्य विघ्ने, राहुल गोदेराव, पूर्वा पोचलवार, जयवंत इंगळे, संजीवनी बुटी, प्रशांत सहारे, शैलेजा बडे, प्रमोद ठाकरे, मनीषा ठाकरे, उत्पल धारगावे, पुनम मिर्झा, हूशंग गायकवाड, डॉ. प्रज्ञा भेलावा, आशिष, मयुरी धारगावे, प्रवीण एम, विशाली खरालकर, आरती बकाल, अरुण बकाल, आणि विजया गोरे या गायक कलाकारांनी आपल्या सुरेल आवाजाने प्रस्तुत करून श्रोत्यांची मने जिंकली. विशेष म्हणजे व्हॅलेंटाईन डे स्पेशल डुएट गाण्यांचे सादरीकरण करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शिवजयंती निमित्त विशेष वेशभूषेत सादर केलेले" हे नरसिंघे" या गीताने समा बांधली. रेना पुरी यांनी निवेदनाची धुरा सांभाळली होती. दरम्यान उपस्थित प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींचे सुद्धा स्वागत करण्यात आले. संगीतप्रेमी करीता सस्मरणीय अशा या कार्यक्रमात प्रतिभासंपन्न कलाकारांनी आपला सहभाग नोंदवून एकाहून एक अश्या श्रवणीय गीतांच्या प्रस्तुती दिली ज्यामुळे रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

# चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगाव येथे मराठी भाषा व संत साहित्याचा जयघोष

**दैनिक युवक आधार**
**मुबंई वार्ताहर :** चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून "संत साहित्य हाच मराठी भाषेचा भक्कम पाया" या संकल्पनेवर आधारित सकाळी सात ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. हा वारसा पुढील पिढीपर्यंत तितक्याच सक्षमपणे पोहोचवण्याचे कार्य *चिकित्सक समूह संस्था* करीत आहे. गेल्या वर्षी सुद्धा शाळेने सूर्योदय ते सूर्यास्त अखंड मराठी गीतगायनाचा अनोखा विश्वविक्रम केला, ज्याची *इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड* मध्ये नोंद झाली. महाराष्ट्र ही संतांच्या पदस्पर्शाने आणि सहवासाने पुलकित झालेली भूमी आहे. संतांनी भजन,कीर्तन,अभंग व ओव्यांद्वारे सामाजिक प्रबोधन केले. संतांचे विचार विद्यार्थ्यांमार्फत समाजामध्ये प्रभावीपणे पोहोचवण्याचा प्रयत्न चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल ने केला आहे.

चिकित्सक शाळेच्या वागळे सभागृहामध्ये मराठीतील मुळाक्षरे, संतांची तसेच मराठी साहित्यिकांची छायाचित्रे, अभंग, पुस्तके, ग्रंथ, रांगोळी यांची सजावट उत्तम प्रकारे करण्यात आली होती.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत जनाबाई, संत सखुबाई, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत गाडगेबाबा अशा अनेक प्रसिद्ध तसेच दुर्लक्षित संतांचाही समावेश कार्यक्रमात करण्यात आला होता. चलचित्रफितीद्वारे संत चळवळीचा गौरवशाली इतिहास सादर करण्यात आला. चिकित्सक संस्थेचे अध्यक्ष श्री. किशोर रांगणेकर यांचे मार्गदर्शन ,सचिव डॉ. गुरुनाथ पंडित यांच्या नवनवीन संकल्पना व प्रोत्साहनामुळे शिक्षक व विद्यार्थी उत्साहाने अभ्यासपूर्ण कार्यक्रम सादर करतात. शाळेला जणू पंढरीचे स्वरूप प्राप्त झाले होते. श्रीम. सुरेखा गिते व श्रीम.सायली कानडे यांचे सुरेख सूत्रसंचालन , गायन शिक्षिका श्रीम.दीपा भोसले , संगणक शिक्षका श्रीमती प्राजक्ता नेने, मराठी भाषेच्या अभ्यासू शिक्षिका श्रीमती शारदा वायाळ, श्रीमती रसिका नार्वेकर तसेच संपूर्ण शाळा सुशोभीकरणात महत्त्वाचा वाटा उचलणारे कलाशिक्षक श्री भाटकर या सर्वांचे मुख्याध्यापिका श्रीमती संचिता गावडे व पर्यवेक्षक श्री संतोष मांजरेकर यांनी कौतुक केले.

प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता मर्दे ,शिशुवर्गाच्या मुख्याध्यापिका श्रीमती आरती पेवेकर यांनी सकाळी संत साहित्यावर आधारित प्रभात फेरीचे आयोजन केले होते. पारंपारिक पेहराव तसेच संतांच्या वेशभूषेमुळे ही प्रभात फेरी आकर्षणाचा बिंदू ठरली. सदर कार्यक्रमाला विभागाच्या स्थानिक नगरसेविका सौ स्नेहल

# इंद्रराज महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :** शहरातील इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' मोठ्या उत्साहात आणि शैक्षणिक वातावरणात साजरा करण्यात आला. महान शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण यांच्या गौरवार्थ आयोजित या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचा संदेश देण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य जी. जी. राजपूत होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, विज्ञानाशिवाय प्रगती शक्य नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता आपल्यात वैज्ञानिक संशोधकवृत्ती आणि तर्कसंगत विचार करण्याची क्षमता विकसित करावी. प्रमुख वक्ते म्हणून भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. सी. एम. काळे यांनी विज्ञानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी नवनवीन प्रयोगांकडे वळावे, असे आवाहन त्यांनी आपल्या भाषणात केले.

याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक संतोष चौथाईवाले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विज्ञान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि वैज्ञानिक पद्धती या विषयांवर आधारित विविध माहितीपूर्ण भिंतपत्रके तयार केली होती. मान्यवरांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने वैज्ञानिक संकल्पनांचे सादरीकरण केल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोज पालवे यांनी केले, तर समन्वयक म्हणून गणित विभागप्रमुख डॉ. जे. जे. पाटील यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विज्ञान मंडळाचे सदस्य एम. के. बाबरेकर, एम. पी. पालवे आणि इतर प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याचा निर्धार व्यक्त केला.

# राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालयाच्या दहा विद्यार्थिनींचे सुयश

**दैनिक युवक आधार**
**भंडारा जिल्हा प्रतिनिधी /भावेश धंधुकीया**
: राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत राष्ट्रीय शिक्षण संस्था लाखनी अंतर्गत राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालयाच्या दहा विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे .

या परीक्षेत यश मिळणाऱ्या कु. सलोनी बडोले , कु.पलक वंजारी ,श्रुती उंदीरवाडे, धनवी बनपूरकर, ऋतुजा सारवे, खुशी झलके, कल्याणी मते ,भाविका पुरम, आर्या बोदेले ,श्रेया ढवळे, ह्या विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.सौ मीरा विजय बारई यांनी तसेच राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.उदय राजहंस, संस्थेचे उपाध्यक्ष शिवलालजी रहांगडाले,



कार्यवाह ॲड. होमेश्वर रोकडे यांनी यशस्वी विद्यार्थिनीचे कौतुक केले आहे. तर शाळेतील मार्गदर्शक शिक्षक सौ खंडाईत, सौ खेडीकर कु चव्हाण , यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले असून शिक्षकेतर कर्मचारी तसेच शाळा व्यवस्थापनच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ट्रकच्या धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड:-** सिल्लोड-कन्नड राज्य महामार्गावर धानोरा ते वांगी बुद्रुक फाट्यादरम्यान शनिवारी (दि. २८ फेब्रुवारी) दुपारी १२ वाजेच्या सुमारास झालेल्या एका भीषण अपघातात दुचाकीस्वार तरुण जागीच ठार झाला. अमोल जनार्दन भोसले (वय ३५, रा. आडगाव भोसले, ता. कन्नड) असे मृत तरुणाचे नाव असून, सोबत असलेल्या त्यांच्या आई गीताबाई जनार्दन भोसले (वय ६०) या गंभीर जखमी झाल्या आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, अमोल भोसले हे आपल्या आईसह दुचाकीने (क्रमांक MH 20 EB 0943) धार्मिक कार्यक्रमासाठी भोकरदनकडे जात होते. वांगी फाट्याजवळ समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या टाटा ट्रकने (क्रमांक MH 20 GZ 4928) त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, दुचाकीचा पूर्णपणे चक्काचूर होऊन अमोल यांचा जागीच मृत्यू झाला. गंभीर जखमी गीताबाई यांना तातडीने सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले आहे.मृत अमोल भोसले हे आडगाव भोसले येथील विद्यमान ग्रामपंचायत सदस्य होते. विशेष म्हणजे अवघ्या तीन महिन्यांपूर्वीच त्यांचा विवाह झाला होता. त्यांच्या अपघाती निधनामुळे आडगाव भोसले परिसरात शोककळा पसरली आहे. सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही अपघातग्रस्त वाहने ताब्यात घेतली असून, याप्रकरणी पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# सेवानिवृत्ती ही सेवेचा शेवट नसून नवीन पर्वाची सुरुवात :- मनोहर सांगळे

**दैनिक युवक आधार**
**सणसर/विकास क्षत्रिय :** भवानीनगर येथील श्री छत्रपती हायस्कूल व जुनिअर कॉलेजमध्ये आयोजित निरोप समारंभात केंद्रप्रमुख मनोहर सांगळे यांनी सेवानिवृत्ती ही सेवेचा शेवट नसून नवीन पर्वाची सुरुवात असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमात मुख्याध्यापक मा.रमेश रामचंद्र मचाले सर यांचा सपत्नीक शाल-श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.अध्यक्षस्थानी श्री छत्रपती शिक्षण संस्थेच्या सर्व शाखेतील मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते. स्थानिक शाळा समितीचे सदस्य त्यांच्या परिवारातील सदस्यांनीही उपस्थिती



लावली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी मा.रमेश मचाले यांची सेवानिवृत्ती ही सामाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची नवी संधी असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना मा.रमेश मचाले यांनी आपल्या सेवेतील अनुभव मांडले व सहकाऱ्यांचे आभार मानले.हायस्कूल मधील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे सहकार्य करण्यात आले.या प्रसंगी केंद्रप्रमुख श्री मनोहर सांगळे,सिनियर कॉलेजच्या प्राचार्या शिवाली माने देशमुख,कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.गोरे मॅडम,रेशमा मुलाणी मॅडम,नानासाहेब नरुटे,सुनील कोरटकर,राजेंद्र महाडिक,अंकुश येवले,वाल्मीक शिंदे,प्रदीप शिंदे,प्रल्हाद मचाले,प्रकाश कोळेकर,बाळासाहेब गोवेकर,उत्तम चव्हाण, सुखदेव माने यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षिका,कन्या शाळा व ज्युनियर विभागाचा स्टाफ विध्यार्थी उपस्थित होता.

# ज्वालामुखीच्या काठावर जग

## इराण–अमेरिका–इस्त्राईल संघर्ष आणि भारताची भूमिका

मध्यपूर्वेतील तणाव पुन्हा एकदा उफाळून आला आहे. इराण, अमेरिका आणि इस्त्राईल यांच्यातील संघर्ष आता जागतिक राजकारणाचा केंद्रबिंदू बनला आहे. हवाई हल्ले, क्षेपणास्त्र सज्जता आणि राजनैतिक आरोप-प्रत्यारोप यामुळे परिस्थिती अधिकच तणावपूर्ण झाली आहे.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या मृत्यूबाबत काही माध्यमांतून बातम्या समोर आल्या आहेत; मात्र अधिकृत आणि निर्विवाद पुष्टी अद्याप स्पष्ट झालेली नाही. अशा संवेदनशील क्षणी माहिती युद्ध, अफवा आणि मानसिक दबाव यांचा प्रभाव रणांगणाइतकाच तीव्र असतो.

**संघर्षाचे वाढते परिमाण**

इराणचा अणुकार्यक्रम, इस्त्राईलची सुरक्षा चिंता आणि अमेरिकेचे रणनीतिक हित — या तिन्ही घटकांनी मिळून या संघर्षाला आकार दिला आहे. आतापर्यंत हा संघर्ष 'छायायुद्धा'पुरता मर्यादित होता; पण आता उघड लष्करी हालचालींमुळे परिस्थिती गंभीर बनली आहे.

युद्ध पेटल्यास त्याचे परिणाम केवळ मध्यपूर्वेपुरते मर्यादित राहणार नाहीत. जागतिक तेलपुरवठा, व्यापारमार्ग आणि अर्थव्यवस्था यावर त्याचा थेट परिणाम होईल.

**भारताची भूमिका काय असावी?**

भारतासाठी हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण —

**1.ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न**

भारत आपल्या मोठ्या प्रमाणातील तेलआयातीसाठी मध्यपूर्वेवर अवलंबून आहे. संघर्ष वाढल्यास तेलदर वाढतील, महागाई वाढेल आणि अर्थव्यवस्थेवर ताण येईल.

**2.परराष्ट्र धोरणातील संतुलन**

भारताचे इराण आणि इस्त्राईल या दोन्ही देशांशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. अमेरिकेसोबतही रणनीतिक भागीदारी आहे. त्यामुळे भारताने तटस्थ आणि संतुलित भूमिका ठेवणे आवश्यक आहे.

3.**भारतीय नागरिकांची सुरक्षितता**

मध्यपूर्वेत लाखो भारतीय काम करतात. युद्धजन्य परिस्थितीत त्यांची सुरक्षितता आणि संभाव्य स्थलांतर हा मोठा प्रश्न ठरू शकतो.

**शांततेचा संदेश**

भारताची परंपरा नेहमीच संवाद, शांतता आणि सहअस्तित्वाची राहिली आहे. जागतिक पातळीवर शांततेचे आवाहन करणे आणि राजनैतिक तोडग्यासाठी प्रयत्न करणे ही भारताची नैतिक जबाबदारी आहे.


निष्कर्ष : विकास हवा... विनाश नको!

युद्ध कोणाच्याही हिताचे नसते. ते अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करते, समाजात भीती निर्माण करते आणि मानवतेला जखमा देते.

आज जग एका धोकादायक वळणावर उभे आहे.

भारताने या परिस्थितीत संयम, संतुलन आणि शांततेचा मार्ग स्वीकारला पाहिजे. कारण शेवटी विजय हा शस्त्रांचा नसतो — तो संवादाचा आणि विवेकाचा असतो.

**लेखक:**
**अजय पांडुरंग कापरे**
**महाराष्ट्र संपादक दै युवक आधार**



# संत तुकाराम महाराज विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी/रणजीत सिंह ठाकुर**
: रिसोड येथून जवळ असलेले संत तुकाराम महाराज विद्यालय, कंकरवाडी ता. रिसोड जि. वाशिम येथे दिनांक 28 फेब्रुवारी 2026 वार शनिवारला राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला.डॉ. सि.व्ही रमण यांनी "रमण इफेक्ट" चा शोध लावल्यामुळे या अनुषंगाने व वैज्ञानिक दृष्टिकोनातून विद्यार्थी निर्माण व्हावेत या दृष्टीकोनातून कार्यक्रम घेण्यात आला. शाळेची प्राचार्य साहेबराव जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्यात आला .त्यामध्ये कार्यक्रमाला अध्यक्ष शारीरिक शिक्षक मनोज जाधव हे होते. तर प्रमुख अतिथी शाळेच्या संचालिका अश्विनी ढेकळे मॅडम व रेखा चाटसे मॅडम आणि राम जाधव हे होते . कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या फोटो प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. यावेळी शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांच्याविषयी माहिती सांगण्यात आली.विज्ञान दिनाविषयी वर्ग 7 वीचा विद्यार्थी सोहम आंधळे यांनी आपले विचार व्यक्त केले.कार्यक्रमाला मार्गदर्शन विज्ञान शिक्षिका तसेच शाळेच्या संचालिका अश्विनी ढेकळे मॅडम यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व व रमण इफेक्ट या




विषयी माहिती दिली. रेखा चाटसे मॅडम यांनी सुद्धा राष्ट्रीय विज्ञान दिवस महत्त्व व वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांना कृषी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोज जाधव यांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयी आवड निर्माण होईल याविषयी मार्गदर्शन केले. तसेच कार्यक्रमाचे संचालक शाळेचे शिक्षक मदन खानझोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन राम जाधव यांनी केले.

या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक ,प्राध्यापक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.

# ग्रीन नेचर फाउंडेशन ने होळीच्या पूर्वदिनी केली नेचर पार्कवर इको फ्रेंडली होळी

**दैनिक युवक आधार**
**भंडारा जिल्हा प्रतिनिधी/भावेश धंधुकीया** : लाखनी येथील ग्रीन नेचर फाउंडेशन अर्थात ग्रीनफ्रेंड्स नेचर क्लब लाखनी ने मागील 20 वर्षाप्रमाणे यावर्षी 21 व्या वर्षी सुद्धा पर्यावरणस्नेही होळी व रंगोत्सव उपक्रमाचे आयोजन लाखनी बसस्थानकावरील नेचर पार्कवर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्नेहा कन्या विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक विलास कालेजवार हे तर प्रमुख अतिथी म्हणून ताजुश शरिया कोचिंग क्लासेसचे मिनाझ मोटलानी, सालेभाटा येथील पोलिस पाटील ललिता बोपचे, अ.भा.अंनिसचे तालुका सचिव नामदेव कान्हेकर,सहसचिव सदानंद वासनिक, जि. प. एकोडी ज्युनिअर कॉलेजचे नितेश चोले,ग्रीन नेचर फाउंडेशनचे पदाधिकारी अशोक वैद्य,अशोक नंदेश्वर व प्रा अशोक गायधने हे उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविक करताना प्रा अशोक गायधने यांनी पर्यावरणस्नेही होळी तसेच रंगोत्सव कार्यक्रमाची आवश्यकता का आहे हे विविध संदर्भ व उदाहरणावरून पटवून दिले. सर्वच प्रमुख अतिथींनी पर्यावरणस्नेही होळीचा संदेश घरोघरी पोहचवला पाहिजे असे आवाहन केले.

यानंतर नेचर पार्कवर स्वच्छता अभियान राबवून केरकचरा जमा करण्यात आला व वृक्षपूजनानंतर केरकचरा होळीचे दहन करण्यात आले. यावेळी सर्वच उपस्थित विद्यार्थ्यांनी नका करू रे लाकडाची होळी, करा ग्रामसफाई व करा केरकचऱ्याची होळी असा उद्घोष करून सर्वच प्रवाशांना व नागरिकांना पर्यावरणस्नेही होळी साजरी करण्याचा संदेश दिला.

यानंतर विद्यार्थ्यांना नैसर्गिक कोरडे व ओले रंग तसेच पर्यावरणस्नेही होळी संदेश फलक स्पर्धेचे पारितोषिके व प्रमाणपत्र अतिथींच्या हस्ते देण्यात आले. सोबतच त्यांचे ताजुश शरिया कोचिंग क्लासेसचे संचालिका मिनाझ मोटलानी यांना ग्रीन नेचर फाउंडेशन तर्फे ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



यास्पर्धेत समर्थ विद्यालयाकडून नैसर्गिक कोरडे व ओले रंग तसेच पर्यावरणस्नेही होळी संदेश फलक स्पर्धेमध्ये गीतेश्वरी देशमुख,प्राप्ती देशमुख, आरोही देशमुख, चारू खराबे, कावेरी खराबे, चेतनानंद खराबे, चैतन्य खराबे, मानव खराबे, अमन देशमुख, आराध्या आगलावे , मंथन वैद्य, ईशान वैद्य यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक तसेच प्रोत्साहनपर क्रमांक देण्यात आले. राणी लक्ष्मी कन्या विद्यालयामधून नैसर्गिक कोरडे व ओले रंग तसेच पर्यावरणस्नेही होळी संदेश फलक स्पर्धेमध्ये नयना पाखमोडे, भार्गवी शेंडे, आराध्या बोपचे, हर्षिता बोपचे, कृणाली बोपचे व सौम्या वैद्य, चारू वैद्य यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय,व तृतीय तसेच प्रोत्साहनपर क्रमांक प्राप्त झाला.

जिल्हा परिषद गांधी विद्यालय लाखनी येथील नैसर्गिक कोरडे व ओले रंग तसेच पर्यावरणस्नेही होळी संदेश फलक स्पर्धेमध्ये सना सैय्यद, श्रावणी शेंडे, नक्ष गडकरी, दिया श्यांकुवर , श्रुती हारगुडे व पंकुडी वंजारी, दिव्या कुंभलकर यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक तसेच प्रोत्साहनपर क्रमांक प्राप्त झाला. ताजुश शरिया कोचिंग क्लासेसचे विद्यार्थी अभिदा थोटे, अन्विक्षा थोटे, निराली वंजारी,मिताली गायधनी, याशी वंजारी, जान्हवी निर्वाण , लावण्या निर्वाण, सुमती बजाज, परिधि भोंगाडे मरियम आकबानी यांना नैसर्गिक कोरडे व ओले रंग तसेच पर्यावरणस्नेही होळी संदेश फलक स्पर्धेत अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक तसेच प्रोत्साहनपर क्रमांक प्राप्त झाला. स्पर्धेचे परीक्षण मिनाझ मोटलानी व ललिता बोपचे यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन अशोक वैद्य तर आभार प्रदर्शन सदानंद वासनिक व अशोक नंदेश्वर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य प्रदिप गायधनी, शिक्षिका वैशाली गायधनी, लाखनी बसस्थानक वाहतूक नियंत्रक श्यामकांत गिऱ्हेपुजे,देशमुख नाश्ता व चहा सेंटरचे बोवा देशमुख, गुरुकुल आयटीआय चे प्राचार्य खुशालचंद मेशराम, सिद्धिविनायक हॉस्पिटलचे संचालक डॉ मनोज आगलावे, मुंबई येथील पोलीस उपअधीक्षक नेताराम मस्के, देशमुख एक्स रे व सोनोग्राफी क्लिनिकचे डॉ प्रमोद इमदेव देशमुख, श्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ योगेश गिऱ्हेपुंजे व डॉ छगन राखडे, नाना वाघाये, सेवानिवृत प्राचार्य अशोक हलमारे व माधवराव भोयर, रमेश गभने, डॉ दिलीप अंबादे, गोपाल बोरकर, निर्वाण इलेक्ट्रिकल्सचे भूपेन्द्र निर्वाण सर्व निसर्गमित्र विवेक बावनकुळे, पंकज भिवगडे, मयूर गायधने, सलाम बेग, धनंजय कापगते, दर्वेश दिघोरे, खेमराज हुमे इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

# वंचित बहुजन आघाडीची परतूर तालुका कार्यकारिणी जाहीर

## आष्टी येथे दिमाखदार कार्यक्रमात हनुमंत दादा मोरे यांची तालुका अध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना (अशोक ठोके)** : सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयाने प्रेरित आणि बहुजन समाजाच्या सशक्तीकरणासाठी कटिबद्ध असलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या परतूर तालुका कार्यकारिणीची घोषणा आष्टी येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या ठिकाणी परतूर तालुका अध्यक्षपदी हनुमंत दादा मोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे.



याचवेळी तालुका उपाध्यक्षपदी नामदेवजी नाचन, संकेत प्रधान, तसेच शेख कदीर शेख हुसेन यांची निवड जाहीर करण्यात आली. संघटक म्हणून बालासाहेब फुलारी, सचिवपदी कृष्णा थोरात, तर तालुका व सर्कल सहाय्यक निरीक्षकपदी गणेश वैद्य यांची जबाबदारी सोपविण्यात आली. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात आष्टी येथील युवा उपाध्यक्ष शाखेर मणियार व उपाध्यक्ष राजू शेख यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर, ज्येष्ठ नेते चोखा नाना सौंदर्य, जिल्हा सचिव जमीर भाई शेख,ज्ञानेश्वर थोरात तसेच सामाजिक कार्यकर्ते भगवान वाघमारे आणि भागवत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी आपल्या भाषणातून संघटन बळकट करण्याचे, तळागाळातील प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यात अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले.

नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून परतूर तालुक्यात संघटन अधिक मजबूत होईल आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी प्रभावी लढा उभारला जाईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.हा सोहळा केवळ पदनियुक्तीचा नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाच्या नव्या पर्वाची नांदी ठरला.

# कोठला येथील हुजैब शेख यांचा पहिला रोजा पुर्ण

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख** : शहरातील सहा वर्षीचा हुजैब तौफिक शेख यांचा मुलगा आपले रशीद शेख दै युवक आधार चे (पत्रकार) यांचे नातु आहे यांने पवित्र रमजान महिन्यात शुक्रवारी आपला पहिला रोजा यशस्वीपणे पूर्ण केला एवढ्या लहान वयात उपवासाचे कठोर पालन करुन संयम व श्रद्धेचे अनोखे उदाहरण निर्माण केल्याबद्दल त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे रमजान महिन्यात मुस्लिम बांधव सूर्योदयापूर्वी (पहाटे) ते



सूर्यास्तापर्यंत अन्न पाण्याचा त्याग करतात सध्या फेब्रुवारी महिना असून उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे उपवास करणे अधिक आव्हा नात्मक झाले आहे

अशा विषम परिस्थितीत हुजैब शेखने पहाटे साडेचार पासून ते सायंकाळी सात वाजेपर्यंत काहीही ग्रहण न करता उपवासाचे पालन केले

लहान वयातील मुलांसाठी उन्हाळ्यात उपवास करणे हे विशेष आव्हान मानले जाते मात्र हुजैब हे आव्हान यशस्वीपणे पार करून दाखवले

हुजैबच्या या रोजा उपवासा बद्दल कुटुंबीय त्यांच्या तसेच परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करत यशस्वी जी वनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत

# “मराठीचा अभिमान, स्पर्धा परीक्षांसाठी नवी दिशा – उरणमध्ये भाषा गौरव दिन उत्साहात”


**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर/ उरण रायगड** : उरण नगर परिषदेच्या मासाहेब मीनाताई ठाकरे ग्रंथालयात माननीय जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून एमपीएससी, यूपीएससी, सीए तसेच पोलीस भरती परीक्षांसाठी विशेष अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी ही अभ्यासिका मार्गदर्शक ठरणार असून स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे.मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात माननीय श्री संतोष पवार आणि ॲड. निरंतर सावंत यांनी मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनाविषयी प्रभावी मनोगत व्यक्त केले. ॲड. निरंतर सावंत यांनी मराठी भाषा जास्तीत जास्त बोलणे आणि ती जिवंत ठेवणे हे प्रत्येक मराठी



माणसाचे कर्तव्य असल्याचे नमूद केले.तर श्री संतोष पवार यांनी मराठी भाषा टिकवण्यासाठी मुलांना मराठी शाळांमध्ये शिक्षण देणे आवश्यक असल्यावर भर दिला. सेमी इंग्रजी माध्यमामुळे गणित, विज्ञान आणि इंग्रजी विषय शिकवले जात असले तरी मराठी माध्यमातून मराठी विषय आणि व्याकरणाची सखोल जाण निर्माण होते, ज्यामुळे वाचनाची गोडी लागते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ महाराज यांचे अजरामर साहित्य समजून घेता येते आणि त्यामुळे विचारांची प्रगल्भता व चौफेर व्यक्तिमत्व विकास साधता येतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

याउलट भाषेकडे दुर्लक्ष केल्यास मोडी लिपी व संस्कृत भाषेसारखी अवस्था निर्माण होऊ शकते, असे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, ८०-९० वर्षांपूर्वीच्या मोडी लिपीतील सरकारी दस्तऐवज वाचण्यासाठी आज जाणकार व्यक्ती उपलब्ध नाहीत. त्यामुळे मातृभाषेतील संवाद वाढवणे आणि भाषा टिकवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थितांनी विषयावर सखोल चर्चा करून विचारांची देवाणघेवाण केली. अशा प्रकारे उरण नगरपरिषदेच्या मॉसाहेब मीनाताई ठाकरे वाचनालयात मराठी भाषा दिन उत्साहात आणि यशस्वीरीत्या साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी श्री जयेश वत्सराज यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्रीरामपूर प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाची घरघुसखोर आणि पोलिसांकडून बोळवण



**दैनिक युवक आधार**
**लोणी प्रतिनिधी,/ज्ञानेश्वर साबळे** : जिथे देव नसतो तिथे आई असते म्हणूनच साने गुरुजी म्हणतात स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी पण पोटचा मुलगा संभाळ करत नाही म्हणून मोठ्या लेकीने कुणाच्या तरी साथीने नियोजित योजना आखून मानवतेला काळिमा फासणारी घटना श्रीरामपूर येथे नुकतीच घडली.

येथील वार्ड क्र.४ बाजार तळ सानप ऑटोमोबाईल च्या पाठीमागे राहणाऱ्या चंद्रभागा रामभाऊ सोनवणे (वय ७६) यांना त्यांची मोठी मुलगी नंदा नानासाहेब चव्हाण (वय ५०) या आपल्या पतीबरोबर झालेल्या किरकोळ भांडणाचे कारण दाखवून चंद्रभागा सोनवणे यांच्या घरात घुसखोरी केली.काही दिवसांनी जेव्हा घरमालक चंद्रभागा सोनवणे यांनी मुलगी नंदा हिला तिच्या घरी जाण्याचा आग्रह केला तर त्या लेकीनेच आईलाच आईच्या घरातून बाहेर काढून अक्षरशः रस्तोरस्ती भटकण्यास भाग पाडले. ही जन्मदाती माता ब्लड प्रेशर व इतर आजाराने ग्रस्त असुन डोक्यावर कुठलाही निवारा नाही इतरत्र भटकत असतानाचे सोशल मीडियावर दिसत आहे.

जन्मदाती माता रस्त्यावर आणि इकडे मात्र नंदा रामदास चव्हाण त्यांच्याच आईच्या घरात घुसखोरी करून सुखात जगत आहे आता त्याच घरात व्याजाचा धंदा सुरू असल्याची दबक्या आवाजात चर्चा चालू आहे.घडलेल्या घटना आई चंद्रभागा रामभाऊ सोनवणे दुसरी मुलगी सुनिता रामभाऊ सोनवणे सोनवणे यांनी येथील प्रातांअधिकारी यांच्याकडे आई वडील व ज्येष्ठ नागरिकाचा उदनिर्वाह कल्याण अधिनियम २००७ अंतर्गत अर्ज न्याय मिळावा म्हणून दाखल केला प्रांताधिकाऱ्यानी घेतलेल्या या प प्रकरणाच्या कोणत्याच तारखासाठी नंदा चव्हाण उपस्थित नव्हत्या सतत गैरहजर हजर राहिल्याने प्रांताधिकारी तथा अप्रत्यक्ष पदस्थ अधिकारी ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण श्रीरामपूर यांनी याबाबत आदेश देऊन मालक चंद्रभागा रामभाऊ सोनवणे यांना नंदा नानासाहेब चव्हाण यांनी तात्काळ घर खाली करून देऊन इतरत्र राहण्यास जावे असे आदेश दिले तसेच प्रांताधिकाऱ्यांनी आदेशात पुढे म्हटले आहे की नंदा नानासाहेब चव्हाण यांनी आई चंद्रभागा रामभाऊ सोनवणे कोणत्याही प्रकारचा त्रास दिल्यास अर्जदार यांनी पोलीस निरीक्षक श्रीरामपूर यांना सुचित करावे त्यानुसार पोलीस निरीक्षक श्रीरामपूर पोलीस ठाणे यांनी सामनेवाला याचे विरुद्ध नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी असे आदेश दिले असताना असे आदेश दिले असताना नंदा नानासाहेब चव्हाण या घर खाली करण्याचा फक्त बाहना आणि चालढकल करताना दिसतात उलट गुंड जमवून धाकदपटशा निर्माण करताना दिसतात याबाबत फिर्यादी चंद्रभागा रामभाऊ सोनवणे यांनी श्रीरामपूर पोलीस ठाण्यात दखलपात्र गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केला परंतु पोलिसांनी दखलपात्र गुन्हा न नोंदवता गुन्हा रजिस्टर नं.१७९५/२०२४ भारतीय न्याय संहिता ३५२,३५१ (२) प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.यात पोलिसांची भूमिका देखील संशयास्पद आहे, पुढील तपास पोना शिंदे हे करित आहे.

# मादळमोहीत ह.भ.प.बाळू महाराज गिरगाव यांचे कीर्तन

**दैनिक युवक आधार**
**गेवराई प्रतिनिधी/भीमराव गावडे** : श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान मादळमोही येथे भगवंत कृपेने श्री.संत सम्राट नगदनारायण महाराज यांच्या कृपेने ह.भ.प.प. पु. गुरुवर्य वें. महादेव महाराज (श्री.क्षेत्र संस्थान नारायणगड) यांच्या आशिर्वादाने व ह.भ.प.प.पु.गुरुवर्य महंत शिवाजी महाराज (श्री. क्षेत्र संस्थान नारायणगड) यांच्या शुभहस्ते

श्री क्षेत्र नारायण गडाचे




उत्तराधिकारी ह. भ.प.संभाजी महाराजांच्या कुशल अशा नेतृत्वाखाली चालू असलेला श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या 376 व्या वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह भक्तिभावात व उत्साहात प्रारंभ. चौथ्या दिवशी ह.भ.प.श्री समाधान महाराज शर्मा यांच्या सुमधुर, भावस्पर्शी व समाजप्रबोधनपर कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.आज ह.भ.प.बाळू महाराज गिरगाव यांचे 9 ते 11 या वेळेत कीर्तन होणार आहे.

सप्ताह काळात दररोज पहाटे काकडा आरती, सकाळी हरिपाठ, दुपारी रामायण व रात्री कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम चालू आहेत .विठ्ठल नामाच्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थित असतात .सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्तीमय व पावन वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाचे शेवटच्या दिवशी ह.भ.प. महंत श्री शिवाजी महाराज (श्री क्षेत्र नारायण गड संस्थान मठाधिपती)यांची कीर्तन सेवा संपन्न होणार आहे.कार्यक्रमाच्या सांगतेदिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# राऊळगाव स्फोटातील मृतांच्या वारसांना पाच लाखांची मदत, दुर्घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग**
**मुंबई** : नागपूर जिल्ह्यातील राऊळगाव येथे स्फोटकांच्या एका फॅक्टरीत झालेल्या स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या वारसांना पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले आहे.

याशिवाय संबंधित कंपनी देखील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणार आहे. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, मी स्थानिक प्रशासनाशी सातत्याने संपर्कात आहे. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक हे तातडीने घटनास्थळी पोहोचले आहेत. एनडीआरएफ, एसडीआरएफचे पथक सुद्धा घटनास्थळी आहे. ‘पेसो’ आणि ‘डिश’ यांची पथके पोहोचली आहेत. मदतकार्याला वेग देण्यात आला असून आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेत १८ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने नागपूरला हलवण्यात आले आहे. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

# महावितरणचे अध्यक्ष श्री . लोकेश चंद्र यांचा 'नॅशनल लीडरशिप अवॉर्ड २०२६' ने गौरव

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीची दखल घेत त्यांचा शुक्रवारी (दि. २७) आयोजित यंदाच्या नॅशनल लिडरशिप परिषदेमध्ये 'इंडियाज बिझीनेस लिडर ऑफ एक्सलेन्स अवॉर्ड-२०२६' या पुरस्काराने गौरव करण्यात आला.



मुंबई येथील स्टॉक एक्सचेंजच्या इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉलमध्ये टाइम्स एस्पायर या संस्थेच्या वतीने नॅशनल लिडरशिप शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत संस्थात्मक उत्कृष्ट नेतृत्व, पर्यावरण व शाश्वत ऊर्जा, नाविन्यपूर्ण उपक्रम, कौशल्य विकास, आधुनिक तंत्रज्ञान आदींवर सादरीकरण व चर्चा करण्यासाठी देशातील खासगी व सरकारी विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांना जाहीर झालेला पुरस्कार त्यांच्यावतीने संचालक (संचालन) श्री. सचिन तालेवार, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट यांनी स्वीकारला.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन सुरु आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. यामध्ये महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ८२ गिगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी 'मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०' व 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजना अत्यंत उपयुक्त ठरत आहे. या दोन्ही योजनेतून सध्या १८ लाख ८२ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरु झाला आहे.महावितरणकडून विजेच्या मागणीचा अंदाज व त्याचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे विश्लेषण करण्यासाठी स्वतंत्र प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्याद्वारे मागणीचा अचूक अंदाज व सर्वात कमी खर्चात वीज खरेदीचे व्यवस्थापन सुरू आहे. यासह ऊर्जा क्षेत्रातील विविध योजना, डिजिटल ग्राहकसेवेचे प्रभावी व्यवस्थापन व नाविन्यपूर्ण नेतृत्वासाठी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांची या पुरस्कारासाठी निवड झाली.

# वैनतेय विद्यालयात मराठी राजभाषा दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी /राहुल कुलकर्णी** : निफाड येथील वैनतेय विद्यालयात मराठी राजभाषा दिन विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा गौरव करत विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचन, ओवी वाचन व निरूपण, कविता वाचन, समूहगीत, जात्यावरच्या ओव्या, अंगाई गीत, वाचन कट्टा आदी कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक उपप्राचार्य सुभाष खाटेकर यांनी केले. याप्रसंगी बी.वाय.के. कॉलेजचे माजी प्राचार्य प्रा. डॉ. केशव शिंपी, न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले, बाळासाहेब कासार, विद्यालयाच्या प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ व पर्यवेक्षिका श्रीमती आर. एम. लाहोटी आदी मान्यवर उपस्थित होते.

ज्ञानेश्वरी ग्रंथाचे ओवी वाचन व निरूपण एस. यू. वाघ व श्रीमती एस. एस. पवार यांनी केले. शब्दकोश, विश्वकोश व व्युत्पत्ती कोश यांचा परिचय समृद्धी सांगळे, रुद्राक्षी शिंदे व दुर्वा बस्ते यांनी करून दिला. गणेश कुयटे यांनी कुसुमाग्रज यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला.

विद्यार्थिनी गौरी गाजरे हिने 'माझे जगणे होते गाणे' हे गीत सादर केले, तर अनुजा देवरे हिने 'कणा' या कवितेचे प्रभावी वाचन केले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी कृतीसह जात्यावरच्या ओव्या सादर करत ग्रामीण संस्कृतीचे जिवंत दर्शन घडवले. 'लीळाचरित्र' ग्रंथाविषयी माहिती श्रीमती एस. एस. पवार यांनी दिली.'स्थान मानाच जगात देऊ मराठी भाषेला' हे समूहगीत विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच 'बीज जसे अंकुरले' या गीतावर आधारित समूहनृत्याने कार्यक्रमात रंगत आणली. इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी 'निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई' हे अंगाई गीत सादर करून वातावरण भारावून टाकले. तमन्ना पठाण, विद्या टोपे, वैष्णवी गायकवाड, चैताली चोरडिया, गौरी गाजरे व अनुजा देवरे यांनी बोली भाषेचे सादरीकरण केले. श्रावणी तांबे हिने लावणी नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

प्रा. डॉ. केशव शिंपी यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेचे सांस्कृतिक, ग्रामीण व प्रमाण रूपांचे महत्त्व विशद केले. मातृभाषेतून ज्ञान मिळविण्याचे महत्व अधोरेखित करत संत परंपरेचे भाषासमृद्धीसाठी असलेले योगदान विविध अभंगांच्या माध्यमातून स्पष्ट केले. वि. दा. व्यवहारे यांचेही मार्गदर्शनपर भाषण झाले.'जागर वाचन संस्कृतीचा' या उपक्रमांतर्गत निफाड शहरात वाचन कट्टा लावण्यात आला होता. नागरिकांनी या ठिकाणी पुस्तक वाचनाचा आनंद घेतला. तसेच भित्तीपत्रिका व साहित्यिक उताऱ्यांच्या पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रशीद पठाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका श्रीमती आर. एम. लाहोटी यांनी केले.

# दैनिक युवक आधारचा दणका; आमदार अमित भाऊ झनक यांची तात्काळ सकारात्मक प्रतिक्रिया

## मालेगाव–आमखेडा 'मृत्यूचा सापळा' प्रकरण अधिवेशनात घुमणार

## बोरगाव–पिंपळा–आमखेडा रस्त्याच्या तातडीच्या दुरुस्तीचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशिम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव (वाशिम) बोरगाव–पिंपळा–आमखेडा दरम्यानचा रस्ता अत्यंत धोकादायक बनल्याची वस्तुस्थिती दैनिक युवक आधारने ठळकपणे प्रसिद्ध केल्यानंतर या प्रश्नाला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर दैनिक युवक आधारचे वाशिम जिल्हा प्रतिनिधी यांनी रिसोड–मालेगाव मतदारसंघाचे लाडके आमदार आदरणीय अमित भाऊ झनक यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सदर बातमीची माहिती दिली व रस्त्याच्या गंभीर अवस्थेकडे लक्ष वेधले.




यावेळी आमदार अमित भाऊ झनक यांनी दैनिक युवक आधारने प्रकाशित केलेल्या बातमीची गंभीर दखल घेतली जाईल, असे स्पष्ट शब्दांत आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, दैनिक युवक आधारने मांडलेला हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत संबंधित विभागाशी तातडीने संपर्क साधून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

मालेगाव ते आमखेडा हा मार्ग ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी मानला जातो. मात्र सध्या या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः बोरगाव–पिंपळा–आमखेडा दरम्यान रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून अनेक ठिकाणी रस्ता पूर्णपणे उखडला आहे. यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दैनिक युवक आधारच्या जिल्हा प्रतिनिधींनी या गंभीर परिस्थितीची माहिती आमदार अमित भाऊ झनक यांना दिल्यानंतर त्यांनी तात्काळ सकारात्मक भूमिका घेतली. या प्रश्नाची शंभर टक्के दखल घेतली जाईल व आगामी अधिवेशनात हा मुद्दा आवर्जून उपस्थित केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच

> **"दैनिक युवक आधारच्या जिल्हा प्रतिनिधींनी मालेगाव–आमखेडा रस्त्याच्या दुरवस्थेबाबत संपर्क साधून माहिती दिली. हा प्रश्न अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित आहे. या बातमीची निश्चित दखल घेतली जाईल. तसेच अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित करून बोरगाव–पिंपळा–आमखेडा रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने कार्यवाही करण्यात येईल."**
>
> **— आमदार अमित झनक**

विशेषतः बोरगाव–पिंपळा–आमखेडा या मार्गावरील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

दैनिक युवक आधारने सातत्याने नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले असून या वृत्तामुळे आता प्रशासन व संबंधित विभागांवर कार्यवाहीचा दबाव निर्माण झाला आहे. लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाची गंभीर दखल घेतल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून लवकरच या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शिवनामाच्या गजरात पिंपळा होणार भक्तीमय ; शिव महापुराण कथेतून अध्यात्माची दिव्य अनुभूती

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : पिंपळा (ता.मालेगाव, जि. वाशिम) पिंपळा येथील श्री. बजरंग बली संस्थान येथे दि. ०३ मार्च ते १० मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या भव्य शिव महापुराण कथा सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर शिवमय आणि भक्तीमय वातावरणाने भारावून जाणार आहे. या आठ दिवसीय दिव्य सोहळ्यातून भगवान शिवाच्या महिम्याचे रसाळ वर्णन होणार असून, भाविकांच्या जीवनात अध्यात्माचा प्रकाश पसरविणारा हा सोहळा ठरणार आहे.




या कथेसाठी प्रमुख कथाकार म्हणून ह.भ.प. ज्ञानेश्वर (माऊली)महाराज चौधरी (पिंपळा) हे आपल्या अमृतमय वाणीने शिवमहिम्याचे दर्शन घडवणार आहेत. त्यांच्या ओजस्वी आणि हृदयस्पर्शी प्रवचनातून भाविकांना भक्ती, श्रद्धा आणि संस्कारांची अनमोल शिकवण मिळणार आहे.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे युवा कीर्तनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर (माऊली) चौधरी पाटील यांची प्रेरणादायी कीर्तनसेवा. अल्पवयातच त्यांनी आपल्या प्रभावी कीर्तनातून हजारो भाविकांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या मधुर वाणीतील नामस्मरण आणि अध्यात्मिक विचार युवकांमध्ये भक्तीची प्रेरणा निर्माण करीत असून, त्यांच्या कीर्तनाची भाविक आतुरतेने वाट पाहत आहेत.

तसेच विदर्भातील आध्यात्मिक क्षेत्रात अत्यंत आदराने घेतले जाणारे नाव म्हणजे ह.भ.प. मुरलीधर महाराज धोंगडे. आपल्या सखोल ज्ञान, साधी जीवनशैली आणि प्रभावी प्रवचनामुळे त्यांनी असंख्य भाविकांच्या जीवनात अध्यात्माची ज्योत प्रज्वलित केली आहे.

त्यांच्या उपस्थितीमुळे या सोहळ्याला विशेष आध्यात्मिक तेज प्राप्त होणार असून, भाविकांसाठी हे एक दुर्मिळ पर्वणीचे क्षण ठरणार आहेत.

या शिव महापुराण कथा सोहळ्यात ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मोरे, ह.भ.प. कृष्णदास महाराज गावंडे, ह.भ.प. ओम महाराज वानखेडे, ह.भ.प. डॉ. कैलास महाराज कापसे, ह.भ.प. जय महाराज रत्नपारखी, राष्ट्रसंत भागवताचार्य सुनील महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज वानखेडे यांच्यासह अनेक संत-महंत आपली सेवा अर्पण करणार आहेत. तसेच ह.भ.प. गणेश महाराज चौधरी आणि ह.भ.प. शिवशंकर महाराज लांडे यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे.

दररोज सकाळी कीर्तन व प्रवचनातून शिवमहिम्याचा गजर होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. या सोहळयामुळे संपूर्ण पिंपळा नगरी भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माच्या प्रकाशाने उजळून निघणार असून, हजारो भाविक या दिव्य सोहळयाचा लाभ घेणार आहेत.

श्री बजरंग बली संस्थान आणि समस्त गावकरी मंडळाच्या अथक प्रयत्नातून आयोजित हा सोहळा भाविकांच्या जीवनात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा अमूल्य ठेवा निर्माण करणारा ठरणार आहे.

# अजिंठा वनपरिक्षेत्रातील 'त्या' व्हायरल व्हिडिओप्रकरणी संशयिताला वनविभागाची नोटीस

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर /सिल्लोड :-** अजिंठा वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या टिटवी कालिका गड येथील संरक्षित वनक्षेत्रात एका संशयित इसमाने फटाके फोडल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या कृत्यामुळे वनसंपदेला आणि वन्यजीवांच्या अधिवासाला धोका निर्माण झाल्याची तक्रार प्राप्त होताच, वनविभागाने तातडीने दखल घेत संशयित व्यक्तीला नोटीस बजावली असून चौकशी सुरू केली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाणा येथील शाम चितळे नामक एका संशयित व्यक्तीने टिटवी कालिका गड परिसरात एका तोफेसारख्या वस्तूमध्ये फटाके ठेवून ते फोडल्याचा व्हिडिओ फेसबुकवर प्रसारित केला होता. हा प्रकार समोर आल्यानंतर जैवविविधता संवर्धनासाठी कार्यरत असलेले डॉ. संतोष पाटील यांनी उपवनसंरक्षक सुवर्णा माने यांच्याकडे तक्रार केली. वनक्षेत्रात अशा प्रकारे स्फोटक वस्तू किंवा फटाके वापरणे हे प्रतिबंधित असून, यामुळे वणवा लागण्याची शक्यता असते, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष दोडके व त्यांच्या पथकाने २८ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यानंतर वनविभागाच्या पथकाने बुलढाणा येथे जाऊन संबंधित संशयित व्यक्तीला चौकशीसाठी कायदेशीर नोटीस बजावली आहे. या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले.

उपोषणाचा इशारा: या प्रकरणी येत्या सोमवारपर्यंत रीतसर गुन्हा दाखल न झाल्यास, मंगळवारपासून सिल्लोड येथील सहायक वनसंरक्षक उपविभाग कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा डॉ. संतोष पाटील यांनी दिला आहे. या घटनेमुळे वनक्षेत्रातील शिस्तीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# सातबारावर हात साफ... नदीवर डल्ला....

## हप्तेखोरीमुळे नद्यांचा ऱ्हास?.. महसूल यंत्रणा थेट संशयाच्या भोवऱ्यात

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे** : भोकरदन तालुक्यात अवैध वाळू उपशाचा धंदा दिवसेंदिवस बोकाळत चालला असून,महसूल प्रशासनातील काही 'महा भाग' कर्मचाऱ्यांच्या कथित हप्तेखोरीमुळे संपूर्ण नदीपात्रांचे अक्षरशः खोदकाम सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. तहसीलदार कार्यालयापासून मंडळ अधिकारी व तलाठी स्तरापर्यंत माहिती गळतीची साखळी कार्यरत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे.विशेष म्हणजे,जेव्हा महसूल पथक अवैध वाळू तस्करांवर कारवाईसाठी रवाना होते,तेव्हाच माफियांना आधीच खबर मिळते... ही माहिती कुठून जाते? कोण देतो?स्थानिक सूत्रांनुसार, पथकातीलच काही कथित हप्तेखोर अधिकारी-कर्मचारी मोबाईलवरून वाळू माफियांना सूचना देतात.परिणामी,पथक घटनास्थळी पोहोचेपर्यंत ट्रॅक्टर गायब,डंपर गायब,यंत्रसामग्री गायब, प्रत्यक्षात कारवाई शून्य!कागदोपत्री मात्र पेट्रोलिंग सुरू ही कारवाई आहे की केवळ कागदी दिखावा,असा संतप्त सवाल आता जनतेतून उपस्थित होत आहे.याच महसूल यंत्रणेत काही तलाठी थेट संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.भोकरदन शहरात एखाद्या नागरिकाने जागा विकली,की दुसऱ्याचे क्षेत्रच गायब होणे ही "महसूल जादू" असल्याचे वास्तव समोर येत आहे.निरपराध नागरिकाच्या सातबारावरील क्षेत्र कमी होते... मात्र संबंधित तलाठ्याकडे



तक्रार करूनही दुरुस्ती नाही पाठपुरावा करूनही न्याय नाही हा प्रकार चूक आहे की लुट? प्रशासन मुद्दाम डोळेझाक करत आहे का भोकरदन शहरात असे प्रकार सातत्याने घडत असताना प्रशासन गप्प का?नागरिकांची ठाम मागणी आहे की संशयित तलाठ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी,वाळू माफियांवर कडक कारवाई करावी आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळावा"जर महसूल यंत्रणाच माफियांना पाठीशी घालत असेल,तर कायदा कोणासाठी?"हा सवाल आता बंद दरवाजाआड नाही,तर रस्त्यावर उघडपणे विचारला जात आहे.आम्ही वरपर्यंत हप्ता देतो आमचे कोणीही बिघडू शकत नाही,अशे उघडपणे बोलले जात असून जिल्हाधिकारी काय करणार महसूलच्या कर्मचाऱ्यांचा धडा शिकवणार की त्यांना पाठीशी घालणार....

# खिशातून 50 हजारांची रोकड लंपास; संतप्त शिवसैनिकांचा शिरपूर पोलीस ठाण्यावर धडक मोर्चा, तात्काळ कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : (रिसोड) शिरपूर येथील शिवसेना शहर प्रमुख कैलास राऊत यांच्या खिशातून अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत तब्बल ५० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे शिवसैनिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून संबंधित चोरट्याचा तात्काळ शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिरपूर पोलीस ठाण्यात धडक देत केली.



मिळालेल्या माहितीनुसार, कैलास राऊत हे शिरपूर येथील गर्दीच्या ठिकाणी उपस्थित असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील ५० हजार रुपयांची रोकड चलाखीने लंपास केली. ही बाब लक्षात येताच परिसरात खळबळ उडाली. दिवसाढवळ्या आणि गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारे चोरी होणे ही गंभीर बाब असून नागरिकांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच शिवसेना जिल्हाप्रमुख महादेव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तालुकाप्रमुख प्रदीप पाटील कुटे, तालुका समन्वयक विलास जाधव, उपजिल्हाप्रमुख संजय भुतेकर, शहर प्रमुख कैलास भाऊ राऊत बाविस्कर, पठन ठाकूर यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी शिरपूर पोलीस ठाण्यात धडक दिली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाला जाब विचारत आरोपीचा तात्काळ शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

शिवसेना पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले की, अशा घटना वारंवार घडत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करून आरोपीला त्वरित अटक करावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

दरम्यान, शिरपूर पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेत तपास सुरू केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहेत. आरोपीचा लवकरच शोध घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन पोलिसांनी दिले आहे.या घटनेमुळे शिरपूर परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांनी पोलिसांनी गस्त वाढवून नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

**शिरपूर येथे शिवसेना शहर प्रमुखांच्या खिशातून ५० हजार रुपयांची चोरी होणे ही अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपीला तात्काळ अटक करावी. अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.**

**— महादेव ठाकरे**
**जिल्हाप्रमुख, शिवसेना**

**शिरपूर परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांनी नियमित गस्त वाढवून गुन्हेगारीवर आळा घालावा आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे. आरोपींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.**

**— विलास जाधव**
**तालुका समन्वयक, शिवसेना मालेगाव**

**दिवसाढवळ्या अशा प्रकारे चोरी होणे ही गंभीर बाब असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पोलिस प्रशासनाने या प्रकरणाला प्राधान्य देऊन आरोपीचा त्वरित शोध घ्यावा आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात.**

**— प्रदीप पाटील कुटे**
**तालुकाप्रमुख, शिवसेना मालेगाव**

# ऑर्बिटल एआय डेटा सेंटर्स : पृथ्वीवरील 'डिजिटल' भाराला आता आकाशाचे वेध !

माहिती तंत्रज्ञानाचा स्फोट आणि एआयचा वाढता वापर यामुळे डेटा सेंटर्स हा सध्याच्या काळातला परवलीचा शब्द झाला आहे. या डेटा सेंटर्सना लागणारी ऊर्जा आणि पाणी हे यापुढच्या काळातले कळीचे मुद्दे असणार आहेत.या प्रश्नावर मात करण्यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांनी आता थेट अंतराळात डेटा सेंटर्स उभी करण्याचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प योजले आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या 'इंडिया एआय समिट'च्या मंचावर मोठमोठ्या उद्योग समूहांच्या भारतात डेटा सेंटर्स उभारण्यासाठी जाहीर झालेल्या अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणुकीच्या घोषणांनी सध्या आपल्या देशातील तंत्रज्ञान विश्वात खळबळ उडवून दिली आहे. एआयच्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) वाढत्या वापरामुळे डेटा सेंटर्सची आणि पर्यायाने त्यांना लागणाऱ्या विजेची भूक किती प्रचंड आहे, याची प्रचिती यातून येते. आपण ही भव्य डेटा सेंटर्स उभारण्याची तयारी करत असतानाच, जागतिक पातळीवर मात्र चक्क अंतराळात 'डेटा सेंटर्स' उभारण्याची सुरुवात झाली आहे.

**नव्या युगाची सुरुवात**

स्टार क्लाऊड या अमेरिकन कंपनीने २ नोव्हेंबर २०२५ रोजी इलॉन मस्क यांच्या स्पेस एक्स कंपनीचे रॉकेट वापरून एन्विडिया कंपनीचा एच १०० जीपीयू असलेला, एआय

सर्व्हर असलेला स्टार क्लाऊड १ नावाचा कृत्रिम उपग्रह पृथ्वीच्या भूस्थिर कक्षेत स्थापित केला आणि मानवी इतिहासातील एक नवीन युग सुरू झाले. ६० किलो वजनाच्या आणि शीतकपाटाएवढ्या या कृत्रिम उपग्रहाने विज्ञानाचे एक नवीन कवाड उघडले आहे.

सध्याच्या माहितीच्या महास्फोटात रोज विविध माध्यमांद्वारे गोळा होणारी माहिती सुरक्षित साठविण्यासाठी 'क्लाऊड'च्या वापराशिवाय पर्याय उरलेला नाही. आपण सध्या ज्या 'क्लाउड'मध्ये डेटा साठवतो, तो पृथ्वीवरील अवाढव्य, वातानुकूलित आणि प्रचंड वीज खाणाऱ्या डेटा सेंटर्समध्ये बंदिस्त आहे. सद्य:स्थितीत अमेरिकेचा डेटा सेंटर्सच्या बाबतीत जगात दबदबा आहे. तिच्याकडे तब्बल ५,४२६ डेटा सेंटर्स आहेत! जर्मनीकडे फक्त ५२९, चीनकडे ४४९ आणि भारतात २७५. पण अमेरिकेतील 'टेक जायंट्स'कडे हा अवाढव्य पसारा चालवायला ऊर्जा शक्ती नाहीये! सध्या जगातील एकूण वीज वापरापैकी तब्बल दोन टक्क्यांपेक्षा जास्त वीज केवळ डेटा सेंटर्स वापरत आहेत. इंटरनॅशनल एनर्जी एजन्सीच्या अंदाजानुसार, २०२६ पर्यंत हा वापर दुप्पट होऊ शकतो. नॉर्दर्न व्हर्जिनिया आणि सिलिकॉन व्हॅलीसारख्या ठिकाणी तर पॉवर ग्रीड सॅच्युरेशनमुळे नवीन डेटा सेंटर्सना वीज जोडणी नाकारली जात आहे. या सर्व्हरना थंड ठेवण्यासाठी वापरले जाणारे पाणी हाही चिंतेचा विषय आहे. एका हायपरस्केल डेटा सेंटरला कूलिंगसाठी दररोज लाखो लिटर पिण्यायोग्य पाण्याची गरज भासते, त्याचा स्थानिक शेती आणि निवासी पाणीपुरवठ्यावर ताण येत आहे.

गेल्या काही वर्षांत 'जनरेटिव्ह एआय' आणि लार्ज लँग्वेज मॉडेल्सच्या प्रसारामुळे डेटा सेंटर्सच्या मागणीत अभूतपूर्व वाढ झाली आहे. आपण एआयला विचारलेला प्रत्येक प्रश्न किंवा एआयने तयार केलेले प्रत्येक चित्र यासाठी प्रचंड प्रोसेसिंग पॉवर लागते. 'वॉशिंग्टन पोस्ट' आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाने नुकत्याच केलेल्या एका अभ्यासानुसार, ओपनएआयच्या 'चॅटजीपीटी-४' मॉडेलचा वापर करून केवळ १०० शब्दांचा एक ईमेल तयार करण्यासाठी अर्ध्या लिटरपेक्षा (५१९ मिली लिटर ) जास्त पाणी खर्ची पडते. इतकेच नाही, तर एआयला प्रॉम्प्ट देण्यामुळे (प्रश्न विचारण्यामुळे) राष्ट्रीय वीज ग्रिडवरही प्रचंड ताण येतो. तसेच १०० शब्दांचा ईमेल बनविण्यासाठी जितकी वीज लागते (०.१४ किलोवॅट-तास/ 'हँ), तितक्या विजेमध्ये १४ एलईडी बल्ब तब्बल एक तासासाठी प्रकाशित ठेवता येऊ शकतात. सध्या एआयशिवाय पान हलत नसल्याने दुर्दैवाने, पृथ्वीवरील पायाभूत सुविधा या भाराखाली कोलमडत आहेत. डेटा सेंटर कंपन्यांच्या गोदामांमध्ये हजारो हाय-स्पीड जीपीयूज



(ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिट्स) धूळ खात पडून आहेत. कारण त्यांना चालवण्यासाठी लागणारी वीज आणि कूलिंग सिस्टीम उपलब्ध नाहीये. अक्षय ऊर्जा या पर्यायाला मर्यादा आहे. त्यामुळे 'नेट-झिरो' कार्बनचे उद्दिष्ट गाठणे कठीण होते. या कोंडीतून मार्ग काढण्यासाठी उपाय म्हणजे आकाश.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि हाय-परफॉर्मन्स कम्प्युटिंगच्या वाढत्या भुकेमुळे पृथ्वीवरील संसाधने अपुरी पडू लागल्याने, तंत्रज्ञान जगताने आपला मोर्चा थेट अंतराळाकडे वळवला आहे. पृथ्वीच्या कक्षेत फिरणारी 'ऑर्बिटल डेटा सेंटर्स' ही संकल्पना आता केवळ विज्ञान कथा राहिली नसून, ती माहिती युगाची आणि अंतराळ तंत्रज्ञानाची नवी क्षितिजे खुली करत आहे.

**अंतराळ हाच पर्याय**

ऑर्बिटल डेटा सेंटर्सची संकल्पना प्रामुख्याने दोन गोष्टींवर आधारित आहे: अमर्याद सौर ऊर्जा आणि निर्वात पोकळी.

१. ऊर्जेची मुक्त उपलब्धता: पृथ्वीवर सौर ऊर्जेला वातावरण, ढग आणि रात्र यांचा अडथळा येतो. मात्र, पृथ्वीच्या कक्षेतील 'सूर्य-समकालिक कक्षे'त सौर पॅनेल्सना २४ तास अखंड सूर्यप्रकाश मिळू शकतो. येथे सौर ऊर्जेची तीव्रता सुमारे १,३६१ वॅट प्रति चौरस मीटर (ह/`ध्) इतकी असते, जी पृथ्वीवरील पॅनेल्सपेक्षा तीन पट जास्त आहे. यामुळे डेटा सेंटर्सना कार्बन-मुक्त, अखंड वीज मिळते.

२. नैसर्गिक कूलिंग आणि पाण्याची बचत: पृथ्वीवर सर्व्हर थंड करण्यासाठी पाणी आणि चिलर्सचा वापर करावा लागतो. अंतराळात पाण्याचा प्रश्नच येत नाही. तिथे उष्णता 'रेडिएटिव्ह कूलिंग' तंत्राने बाहेर टाकली जाते. सोप्या भाषेत सांगायचे तर, इन्फ्रारेड प्रारणाद्वारे उष्णता थेट डीप स्पेसमध्ये सोडली जाते. हे तंत्रज्ञान पर्यावरणासाठी अत्यंत पूरक आहे.

अंतराळात ऊर्जा मिळवणे सोपे असले तरी, निर्माण झालेली उष्णता बाहेर टाकणे हे सर्वात मोठे इंजिनीअरिंग आव्हान आहे. पृथ्वीवर हवा फिरवून (उःल्ल५ीू३ृःल्ल) उष्णता कमी केली जाते, पण अंतराळातील निर्वात पोकळीत हवाच नसते. त्यामुळे तिथे उष्णता केवळ रेडिएशनद्वारेच बाहेर टाकावी लागते.

एआय पायाभूत क्षेत्रामध्ये बोलबाला असलेल्या 'एनव्हिडिया'च्या आधुनिक जीपीयू चिप्स प्रचंड उष्णता निर्माण करतात. ती बाहेर टाकण्यासाठी उपग्रहांना फुटबॉलच्या मैदानासारख्या विशाल रेडिएटर्सची गरज भासेल. स्टार क्लाऊडसारख्या कंपन्या गिगावॅट क्षमतेचे क्लस्टर्स उभारण्यासाठी ४ किमी ७ ४ किमी आकाराचे (अख्खे दादर-माटुंगा पूर्व -पश्चिम एकत्र) रेडिएटर्स वापरण्याची योजना आखत आहेत. यासाठी उष्णता वाहून नेणारे प्रगत 'फ्लुइड लूप्स' वापरले जातील, जे उष्णतेला चिपपासून रेडिएटरपर्यंत पोहोचवतील.

अंतराळातील किरणोत्सर्ग हे दुसरे मोठे आव्हान आहे. तेथील प्रोटॉन्स आणि हेवी आयन्सनी सिलिकॉन चिप्स खराब करू नये म्हणून हार्डवेअरमध्ये बदल करण्याऐवजी सॉफ्टवेअरमध्ये 'एरर करेक्शन' आणि 'रिडंडन्सी' (एकाच कामासाठी एकाधिक युनिट्स वापरणे) यांसारखी तंत्रे वापरली जात आहेत. यामुळे महागड्या 'स्पेस-ग्रेड' चिप्सऐवजी जमिनीवर वापरल्या जाणाऱ्या स्वस्त आणि वेगवान कमर्शिअल चिप्स अंतराळात वापरणे शक्य होत आहे.आता हे सर्व्हर अंतराळात असले तरी डेटा पृथ्वीवर कसा येणार? इथेच 'ऑप्टिकल इंटर-सॅटेलाइट लिंक्स' किंवा लेझर कम्युनिकेशनची भूमिका महत्त्वाची ठरते.

**आर्थिकदृष्ट्याही फायदेशीर**

सध्या पृथ्वीवरील इंटरनेट हे फायबर ऑप्टिक केबल्सवर अवलंबून आहे. काचेतून प्रवास करताना प्रकाशाचा वेग सुमारे ३१ टक्क्यांनी कमी होतो. मात्र, अंतराळातील निर्वात पोकळीत प्रकाश (आणि डेटा) त्याच्या पूर्ण वेगाने (सुमारे तीन लाख किमी/सेकंद) प्रवास करू शकतो. त्यामुळे लंडनहून सिंगापूरला फायबर केबलने डेटा पाठवण्यापेक्षा, अंतराळातील लेझर मेश नेटवर्कद्वारे डेटा पाठवणे ३० टक्के जास्त वेगवान ठरू शकते. भांडवल बाजारातील हाय-फ्रिक्वेन्सी ट्रेडिंग (ल्राळ) आणि संरक्षण क्षेत्रासारख्या काही कामांसाठी हा वेग अत्यंत मोलाचा आहे.हे सगळे अंतराळात नेण्यासाठी येणाऱ्या खर्चावरही संशोधन सुरू आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत एक किलो वजन अंतराळात नेण्यासाठी २० हजार डॉलर्स खर्च येत असे. इलॉन मस्कच्या स्पेसएक्सच्या फाल्कन ९ आणि आगामी स्टारशिपमुळे हा खर्च २०० डॉलर्सच्या खाली येण्याची शक्यता आहे. दुसरा मुद्दा म्हणजे आज एन्विडियाच्या एका एच १०० जीपीयू रॅकचे पृथीवरचे वजन १.९ टन असते. त्यात १.५ टन वजन 'कूलिंग सिस्टीम'चेच असते. अंतराळात पाण्याने जीपीयू थंड करण्याचे तंत्रज्ञान वापरायची गरजच नसेल तर तिथे तोच रॅक ७५ टक्के कमी वजनाचा नेता येईल, म्हणजे 'वजना'चा वाहतूक खर्च पृथ्वीपेक्षा कमी येईल आणि रॉकेटमध्ये कमी जागा लागेल.

यामुळेच ऑर्बिटल डेटा सेंटर्सचे गणित हळूहळू आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरू लागले आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील अब्जोपतींनी आपले पैसे या कल्पनेवर गुंतविले आहेत. इलॉन मस्क यांची कंपनी स्पेस एक्स २०२६च्या सुरुवातीला 'स्टारलिंक श्३' सॅटेलाइट्स हे नवीन कृत्रिम उपग्रह लाँच करणार आहे. स्टारलिंक श्३ची क्षमता एक टेराबिट प्रति सेकंद (ळुस्र्२) असणार आहे. हे सध्याच्या कृत्रिम उपग्रहांपेक्षा १० पट अधिक शक्तिशाली आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, स्पेस एक्स आपल्या महाकाय 'स्टारशिप' रॉकेटमधून एकाच वेळी असे ६० उपग्रह अंतराळात सोडणार आहे.

जरा तुलना करून बघा. जुन्या काळात एक ळुस्र्२ क्षमतेचा उपग्रह बनवायला बोईंग आणि वायासाटसारख्या कंपन्यांना १० वर्षे आणि करोडो डॉलर्स लागायचे. इथे मस्कसाहेब एका खेपेत ६० पट जास्त क्षमता अंतराळात पाठवणार आहेत, आणि त्यांचा आठवड्याला एक स्टारशिप 'उडवण्याचा' मानस आहे! त्यांचा पुढचा विचार ऐकून तुम्ही थक्क व्हाल. ते म्हणतात, 'चंद्रावर एक तळ बनवून तिथेच सौरऊर्जेवर चालणारे एआय उपग्रह बनवता येतील. आणि मग त्यांना तिथून इलेक्ट्रोमॅग्नेटिक बेचक्या वापरून अंतराळात फेकता येईल.' म्हणजे रॉकेटची गरजच नाही! चंद्रावरची माती वापरा, तिथेच कृत्रिम उपग्रह बनवा आणि तिथूनच लाँच करा !'क्रुसो एनर्जी' आणि 'स्टारक्लाऊड'सारख्या कंपन्या या क्षेत्रात मोठी गुंतवणूक करत आहेत. २०२९ पर्यंत या क्षेत्राची उलाढाल १.७७ अब्ज डॉलर्सवरून २०३५ पर्यंत ३९.१ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. हे केवळ इकडचे सर्व्हर अंतराळात हलवणे नाही, तर ही 'एनर्जी आर्बिट्रेज'ची खेळी आहे. म्हणजेच पृथ्वीवरील महागडी वीज टाळून अंतराळातील 'मोफत' सौर ऊर्जेचा वापर करणे.

**सांस्कृतिक फूटपट्टी**

हे सर्व फक्त इंटरनेट स्पीड वाढवण्यासाठी आहे का? नाही. हे मानवी संस्कृतीच्या पुढच्या टप्प्याकडे जाण्याचे पाऊल आहे.

१९६४ मध्ये रशियन शास्त्रज्ञ निकोलाई कर्दाशेव्ह यांनी संस्कृतींचे वर्गीकरण करण्यासाठी 'कर्दाशेव्ह स्केल' ही मोजपट्टी मांडली होती. यात संस्कृतीची प्रगती ते किती आणि कशी ऊर्जा वापरतात यावर ठरवली जाते.

टाइप १ संस्कृती: ही आपल्या ग्रहावर (पृथ्वी) उपलब्ध असलेली सर्व ऊर्जा (सौर, वारा, इ.) पुरेपूर वापरू शकते.

टाइप २ संस्कृती: ही आपल्या ताऱ्याची (सूर्य) संपूर्ण ऊर्जा वापरू शकते (उदा. डायसन स्फीअरसारख्या रचनेद्वारे).

टाइप ३ संस्कृती: ही संपूर्ण आकाशगंगेची ऊर्जा वापरू शकते.

सध्या आपण जमिनीवर ऊर्जेसाठी भांडतोय, कोळसा जाळतोय आणि कूलिंगसाठी पाणी वाया घालवतोय. पण अंतराळात सौर ऊर्जा अमर्याद आणि विनामूल्य आहे! अंतराळातील डेटा सेंटर्स हे आपलं 'टाइप १' संस्कृतीकडे जाण्याचं पहिलं मोठं पाऊल आहे.

या जागतिक स्पर्धेत भारत फार पुढे नसला तरी फार मागेही नाही. इस्रोची विश्वासार्ह आणि कमी खर्चाची प्रक्षेपण क्षमता भारताला या क्षेत्रात एक नैसर्गिक भागीदार बनवते. पण खरी क्रांती भारतीय स्टार्टअप्स घडवत आहेत. बेंगळूरुस्थित 'गॅलेक्सआय स्पेस' आणि 'पिक्सेल' हे 'एज कम्प्युटिंग'मध्ये आघाडीवर आहेत. हे स्टार्टअप्स उपग्रहावरून डेटा पृथ्वीवर पाठवून प्रोसेस करण्याऐवजी, उपग्रहावरच डेटाचे विश्लेषण करतात. उदा. पिक्सेलचे उपग्रह शेतातील पिकांचे आरोग्य किंवा जमिनीतील खनिजे अंतराळातच ओळखून फक्त निष्कर्ष पृथ्वीवर पाठवतात. यामुळे बँडविड्थ आणि वेळेची प्रचंड बचत होते.तसेच, हैदराबादची 'ध्रुव स्पेस' कंपनी 'स्पेस-अॅज-अ-स्व्हिहस' प्लॅटफॉर्म देत आहे, ज्यामुळे कोणत्याही कंपनीला स्वत:चा उपग्रह न बनवता अंतराळात सर्व्हर ठेवून चाचणी करणे शक्य झाले आहे. भारताची 'डिजिटल इंडिया' मोहीम आता 'ऑर्बिटल इंडिया'कडे वाटचाल करत आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

तंत्रज्ञान पृथ्वीच्या सीमा ओलांडत असतानाच त्या कायदेशीर पेचही निर्माण होत आहेत. पृथ्वीवरील डेटाचे नियम (जीडीपीआर) देशाच्या सीमांशी जोडलेले आहेत. पण अंतराळात कोणाचे कायदे चालणार?

'आउटर स्पेस ट्रीटी'नुसार, ज्या देशाने उपग्रह प्रक्षेपित केला, त्याचे कायदे त्या उपग्रहावर लागू होतात. यामुळे भविष्यात 'डेटा हेव्हन्स' निर्माण होण्याची भीती आहे. कर वाचवण्यासाठी काही देश 'टॅक्स हेव्हन्स' म्हणून वापरले जातात, तसेच कडक सायबर कायदे टाळण्यासाठी कंपन्या आपला संवेदनशील डेटा 'ऑर्बिटल डेटा सेंटर्स'मध्ये लपवू शकतात. युरोपचा अरउएठऊ प्रकल्प आणि अमेरिकेचे खासगी प्रयत्न यांमुळे अंतराळातही माहितीच्या वर्चस्वासाठी शीतयुद्ध होण्याची चिन्हे आहेत.

पुढील काही वर्षे (२०२५-२०२७) या तंत्रज्ञानाच्या चाचण्यांची असतील. त्यानंतर, २०३०च्या दशकात आपण अंतराळात गिगावॅट क्षमतेचे 'क्लाऊड रिजन' पाहू शकू. चंद्रावर 'बॅकअप' डेटा साठवण्यासाठी 'लोनस्टार'सारख्या कंपन्यांचे प्रयत्न सुरू आहेत, जेणेकरून पृथ्वीवर अणुयुद्ध किंवा नैसर्गिक आपत्ती आली तरी मानवी ज्ञानाचा साठा सुरक्षित राहील.शेवटी काय तर, ऑर्बिटल एआय डेटा सेंटर्स हे तंत्रज्ञानातील पुढील मोठे स्थित्यंतर आहे. हे केवळ वेगवान इंटरनेट किंवा स्वस्त ऊर्जेपुरते मर्यादित नाही, तर ते मानवजातीला एका 'मल्टी-प्लॅनेटरी' (बहु-ग्रहीय) संस्कृतीकडे नेणारे एक पाऊल आहे. भारतासारख्या देशासाठी, ज्यांच्याकडे तांत्रिक कौशल्य आणि अंतराळ क्षमता दोन्ही आहे, ही एक जागतिक नेतृत्व करण्याची सुवर्णसंधी आहे.

**- चिन्मय गवाणकर**
**लेखक एका बहुराष्ट्रीय सल्लागार कंपनीचे भागीदार असून त्यांना डेटा ॲनालिटिक्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात २४ वर्षांहून अधिक व्यावसायिक अनुभव आहे.**